गांधी-उपनिषत्

# मंगल-प्रभात

गांधीजी

९५५८
म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
REFBK-0009284

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

# मंगल--प्रभात

[ ‘ मंगल-प्रभात ’ या गुजराथी पुस्तकाचें भाषांतर ]

अनुवादक-- ‘ सहधर्मी ’

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीर-श्रम अस्वाद सर्वत्र भय-वर्जन ॥
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्श-भावना ॥
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रत-निश्चयें ॥

REFBK-0009284

परधाम विद्यापीठ—प्रकाशन

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम-विद्यापीठ
पो. पवनार, जि. वर्धा.

आवृत्ति चौथी.
मे १९५७
मूल्य ५ आणे

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम-मुद्रणालय,
परंधाम-विद्यापीठ, पवनार
जि. वर्धा.

# प्रास्ताविक

१९३० सालीं येरोडें तुरुंगांतून लिहिलेलीं व्रतावरील हीं 'गांधीजींचीं पत्रें' प्रथम 'व्रतविचार' ह्या नांवानें प्रसिद्ध झालीं. मागाहून तींच 'मंगल-प्रभात' ह्या काव्यमय नांवानें प्रगट झालीं. 'मंगल-प्रभात' च्या उदयाची कहाणी आणि त्या नांवाचा उलगडा काकासाहेबांनीं आपल्या सुरस प्रस्तावनेंत केलाच आहे.

मीं ह्याला 'गांधी-उपनिषत्' म्हटलें आहे. कारण, गांधींचें जीवन-विषयक समग्र तत्त्वज्ञान निश्चितपणें त्यांत आलें आहे. आणि तें हि त्यांनीं स्वहस्तें लिहिलेलें स्व-भक्तांस उपदेशिलेलें. हा आहे खरा गांधी-वाद, वादाच्या च भाषेंत बोलायचें तर. वास्तविक, गांधींचा 'वाद' नाहीं, 'योग' आहे. आपण वाद-रत न होता योग-रत होऊं या, उद्योगास लागू या. म्हणजे मंगल-प्रभात उजाडेल आणि आपल्या राष्ट्रांतील अज्ञान, दारिद्य आणि रोगराई ह्यांचा अंधार फिटेल.

ह्या 'व्रत-विचारा'चा, 'मंगल-प्रभात'चा, अथवा गांधी-उपनिषदाचा विनोबांनीं अभंग-वाणींत जो अनुवाद केला आहे, त्यांतून पुढील अभंग गाऊन हें प्रास्ताविक संपवूं.

कोसळो आकाश भासो चिरडलोंसें
परी हा विश्वासें मंत्र जपूं ।

सत्य नित्य आहे, सत्य चि तें आहे
सत्य होउनि राहे परमेश्वर ।

अहिंसा चि एक सत्याचें साधन
कधीं न सोडीन तिची कास ।

सत्य-नारायण हृदयीं स्मरूनि
संकल्प हा मनीं केला थोर ।

एवढा संकल्प व्हावया सफल
तो चि देवो बळ विन्या म्हणे ॥

गोपुरी कुन्दर दिवाण

## ‘ मंगल-प्रभात ’

येरोडें तुरुंगाचें गांधीजींनीं ‘ येरोडें मंदिर ’ नांव पाडलें. तेथें त्यांना बाहेरचीं कांहीं वर्तमानपत्रें वाचायला मिळत, आणि आश्रमांतून हि पत्रें च पत्रें येत असत; तरी पण एकंदरींत त्यांनीं हा निवृत्तीचा काळ सूत्रयज्ञ, चरख्याची भक्ति, आणि गीतेचें मनन यांमध्यें च व्यतीत केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या च मुदतींत साबरमती आश्रमाच्या जीवना-मध्यें अधिक चैतन्य भरण्याची आवश्यकता आहे अशा अर्थाची मागणी एकदोघा बंधूंनीं केल्यावरून त्यांनीं आश्रमवासियांना साप्ताहिक पत्रें लिहिण्यास सुरवात केली. कोणतें हि कार्य सुरू केलें कीं मग तें नियमित झालें च पाहिजे असा गांधीजींचा आग्रह असतो; तदनुसार दर मंगळवारीं सकाळच्या प्रार्थने-नंतर एक प्रवचन लिहून धाडण्याचा त्यांनीं संकल्प

केला. या संकल्पाचें प्रथम फळ म्हणजे आश्रमाच्या व्रतांचें त्यांनीं केलेलें विवेचन होय. तें 'व्रतविचार' या नांवानें प्रसिद्ध झालें.

नमुनेदार कैदी या नात्यानें सरकारला सर्वतोपरी निश्चित करून सोडणाऱ्या गांधीजींनीं तुरुंगांतून स्वदेशीवर कांहीं हि न लिहिण्याचा निर्णय केला. त्यामुळें 'व्रतविचारा' मध्यें तेवढी एक गोष्ट राहून गेली होती. बाहेर आल्यानंतर त्यांनीं स्वदेशीव्रतावर एक लेख लिहून दिला, जो 'नवजीवन' मध्यें प्रसिद्ध झाला आहे. या आवृत्तीमध्यें तो लेख भरीला घातला असल्यानें आश्रम-व्रतांचा विचार संपूर्ण झाला आहे.

वर सांगितल्याप्रमाणें हीं प्रवचनें मंगळवारीं सकाळीं लिहिलीं जात असत, त्यावरून या प्रवचन-संग्रहाचें नांव 'मंगळप्रभात' असें च ठेवलें आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनामध्यें निराशेच्या घोर निशेचें

साम्राज्य पसरलें होतें अशा वेळीं ज्या व्रतांनीं राष्ट्रीय जीवनामध्यें आशा, आत्मविश्वास, स्फूर्ति व धार्मिकता यांचें वातावरण उत्पन्न केलें, त्या व्रतांनीं च अखेरीला एका अभिनव संस्कृतीची मंगलप्रभात सुरू केली असें आपण मानल्यास त्यांत जरा तरी अतिशयोक्ति आहे का ?

**दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर**

# अनुक्रमणिका

| क्रमांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सत्य ... ... | ९ |
| २ | अहिंसा ... ... | १५ |
| ३ | ब्रह्मचर्य ... ... | २२ |
| ४ | अस्वाद ... ... | ३० |
| ५ | अस्तेय ... ... | ३८ |
| ६ | अपरिग्रह ... ... | ४५ |
| ७ | अभय ... ... | ५२ |
| ८ | अस्पृश्यता-निवारण ... | ५७ |
| ९ | अंगमेहनत ... ... | ६४ |
| १० | सर्वधर्मसमभाव-१ ... | ७० |
| ११ | सर्वधर्मसमभाव-२ ... | ७६ |
| १२ | नम्रता ... ... | ८२ |
| १३ | स्वदेशी ... ... | ८८ |
| १४ | स्वदेशीव्रत ... ... | ८९ |
| १५ | व्रताची आवश्यकता ... | ९७ |
| १६ | परिशिष्ट—आश्रमाचीं व्रतें ... | १०३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

# सत्य

२२-७-'३०
सकाळच्या प्रार्थनेनंतर

आपल्या संस्थेचें मूळ च सत्याच्या आग्रहामध्यें राहिलेलें आहे. म्हणून सत्य च प्रथम घेतों.

'सत्य' शब्द 'सत्'वरून आलेला आहे. सत् म्हणजे असणें. सत्य म्हणजे असण्याचा भाव. सत्याव्यतिरिक्त इतर कोणत्या वस्तूला अस्तित्व च नाहीं. परमेश्वराचें खरें नांव च 'सत्' म्हणजे 'सत्य' आहे म्हणून परमेश्वर 'सत्य' आहे. असें म्हणण्यापेक्षां 'सत्य' म्हणजे च परमेश्वर असें म्हणणें अधिक उचित होय. आपलें राज्यकर्त्याखेरीज, सरदाराखेरीज, चालत नाहीं. त्यामुळें परमेश्वर हें नांव अधिक प्रचलित आहे व राहणारहि. पण विचार केला असतां 'सत्' किंवा 'सत्य' हें च खरें नांव होय व हें च पूर्ण अर्थ सूचित करतें.

आणि जेथें सत्य आहे तेथें ज्ञान–शुद्ध ज्ञान– आहे च आहे. जेथें सत्य नाहीं तेथें शुद्ध ज्ञान शक्य च नाहीं. म्हणून च ईश्वराच्या नांवाबरोबर चित् म्हणजे ज्ञान हा शब्द हि जोडलेला असतो. आणि जेथें सत्य ज्ञान आहे तेथें आनंद च असणार, शोक असावयाचा च नाहीं. आणि सत्य शाश्वत आहे त्या अर्थी आनंद हि शाश्वत च असणार. म्हणून च आपण ईश्वराला सच्चिदानंद या नांवानें ओळखीत असतों.

या सत्याच्या आराधनेसाठीं च आपलें जीवित. तत्प्रीत्यर्थ च आपली प्रत्येक हालचाल. त्यासाठीं च आपण प्रत्येक श्वासोच्छ्वास घ्यावयाचा. असें करण्यास शिकलों तर इतर सर्व नियम आपल्या सहजीं हातीं येतील व त्यांचें पालन सुलभ होऊन जाईल. सत्या-विना कोणत्या हि नियमाचें शुद्ध पालन अशक्य आहे.

सामान्यतः सत्य याचा 'खरें बोलणें' एवढा च आपण अर्थ करीत असतों. परंतु येथें सत्य शब्द

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 2/9६५
क्रमांक 1230
वि:
नों: दि:

आपण व्यापक अर्थानें योजिलेला आहे. विचारांत, वाणींत व आचरणांत सत्याचें पालन हें च खरें सत्य. या सत्याचें ज्यानें संपूर्णपणें आकलन केलें त्याला जगांत आणखी कांहीं जाणावयाचें राहत नाहीं, कारण आपण वर पाहिलें च कीं ज्ञानमात्र त्याच्या-मध्यें सांठविलेलें आहे. त्यांत ज्याचा समावेश नसेल तें सत्य नव्हे, ज्ञान नव्हे ; मग त्यांतून खरा आनंद होणार च कोठून ? एवढी ही कसोटी लावून पाहण्याचें आपण शिकून घेतलें कीं मग कोणतें कार्य करण्याजोगें आहे व कोणतें त्याज्य आहे, काय पहावें व काय पाहूं नये, काय वाचावें व काय वाचूं नये, हें आपल्या चटकन् लक्षांत येत जाईल. पण परिसासारखें असलेलें व कामधेनूसमान असें हें सत्य आपल्या हातीं कसें लागावें ? भगवंतांनीं याचें उत्तर दिलें आहे. अभ्यासानें व वैराग्यानें. सत्याविषयींची तळमळ म्हणजे च अभ्यास ; सत्याखेरीजच्या इतर सर्व वस्तूंबद्दल आत्यंतिक उदासीनता म्हणजे च वैराग्य.

असें असतां हि एकाचें सत्य तें च दुसऱ्याच्या दृष्टीनें असत्य असें आपल्याला पदोपदीं आढळेल. परंतु त्यामध्यें घाबरून जाण्याचें बिलकुल कारण नाहीं. जेथें शुद्ध प्रयत्न आहे तेथें भिन्न भिन्न वाटणारीं सर्व सत्यें हीं एका च झाडाच्या निरनिराळया दिसणाऱ्या पानांप्रमाणें होत. परमेश्वरसुद्धां प्रत्येक मनुष्याला निरनिराळा दिसत नाहीं का? तरी पण तो एक च आहे असें आपल्याला माहीत आहे. पण सत्य हा शब्द च परमेश्वरवाचक आहे. म्हणून ज्याला जें सत्य वाटतें तदनुसार त्यानें वागावें यांत दोष नाहीं, एवढें च नव्हे तर तें च कर्तव्य होय. मग तसें करण्यांत चूक होत असली तरी ती सुधारली जावयाची च आहे. कारण कीं सत्याच्या शोधाच्या पाठीशीं तपश्चर्या असणार, म्हणजे च स्वतः दुःख सहन करावयाचें असणार. त्याच्याखातर मरायचें असणार, अर्थात् त्यामध्यें स्वार्थाचा किंचित् वास सुद्धां नसणार. अशा तऱ्हेनें निःस्वार्थ शोध करीत

असतां शेवटपर्यंत कोणी आडमार्गानें गेला असें आजमितीपर्यंत घडलेलें नाहीं. वाट सोडून निघाला कीं ठेंच लागली च; कीं परत तो सरळ रस्त्याला येऊन मिळाला च.

म्हणून च सत्याची आराधना ही च भक्ति; आणि भक्ति म्हणजे तर "शिराचिये साटीं" मिळणारी जिन्नस आहे. किंवा तो 'हरीचा' मार्ग असल्या-मुळें त्यामध्यें भित्रेपणाला जागा च नाहीं. त्यांत अपयश म्हणून कांहीं वस्तु च नाहीं. हा 'मरून अमर होण्याचा–' मंत्र आहे.

पण आतां आपण अहिंसेच्या अगदीं काठाशीं च येऊन पोचलों. तिचा विचार येत्या आठवड्याला करूं.

---

१ हरिनो मारग छे शूरानो, नहि कायरनु काम जोने
संत प्रीतम.
(हरिचा मार्ग असे शूराचा, नच भित्र्याचें काम तिथें.)
आश्रमभजनावलि पहा. —अनुवादक

या प्रसंगीं हरिश्चंद्र, प्रह्लाद, रामचंद्र, इमाम हसनहुसेन, खिस्ती संत इत्यादींचे दृष्टांत विचारांत घेण्यासारखे आहेत. हा जप पुढच्या आठवड्या- पर्यंत सर्व जण, बालक व प्रौढ, स्त्रिया व पुरुष; चालतां बसतां, खातां पितां, खेळतां फिरतां, सर्व कांहीं करतांना करीत राहतील व तो करीत करीत च निर्दोष निद्रा मिळवितील तर काय मौज होईल ! हा सत्यरूपी परमेश्वर माझ्या बाबतींत रत्नचिंतामणि ठरला आहे; तसा च तो आपल्या सर्वांच्या हि बाबतींत ठरो.

० ० ०

# अहिंसा

ता. २९-७-'३०

मंगल-प्रभात

सत्याचा, अहिंसेचा, मार्ग जितका सरळ तितका च बिकट आहे; तरवारीच्या धारेवर चालण्यासारखा आहे. डोंबारी ज्या दोरीवरून सरळ नजर ठेवून चालत जातो, त्या दोरीपेक्षां हि सत्य-अहिंसेची दोरी बारीक आहे. जराशी गफलत झाली कीं आपण खालीं कोसळलों च. प्रतिक्षणीं साधना केल्यानें च त्याचें दर्शन घडणार.

पण सत्याचें संपूर्ण दर्शन तर या देहीं अशक्य आहे. त्याची फक्त कल्पना च करतां येणार. क्षणभंगुर देहामार्फत शाश्वत धर्माचा साक्षात्कार होणें अशक्य होय. अर्थात् अखेरीस श्रद्धेचा आश्रय हा करावा च लागतो.

यावरून च जिज्ञासूनें अहिंसेचा शोध लावला. "माझ्या मार्गांत ज्या अडचणी येतील त्या मी सहन कराव्या कीं त्यांच्या निमित्तानें जें जें नष्ट करावें लागेल तें करीत जावें व आपला मार्ग कापीत जावा ?" असा प्रश्न जिज्ञासूच्या पुढें उभा राहिला. नाश करीत गेल्यास आपण मार्ग कापीत नाहीं, तर होतों तेथें च राहतों असें त्याला कळून आलें. संकटें सहन करीत गेला तर त्याची प्रगति होते. पहिला नाश करतांक्षणीं च त्याला आढळून आलें कीं, आपण ज्या सत्याचा शोध करीत आहों तें सत्य बा`र नसून अंतरांत च आहे. अर्थात् तो जसजसा नाश करीत जाईल तसतसा मागें पडत जाणार, सत्य बाजूला पडत जाणार.

आपल्याला चोर उपद्रव देतात. त्यांचें निवारण करण्यासाठीं त्यांचें पारिपत्य केलें. तेवढ्या क्षणापुरते ते पळून तर गेले खरे, पण दुसऱ्या ठिकाणीं त्यांनीं दरोडा घातला. पण दुसरें ठिकाण झालें तरी आपलें च.

याचा अर्थ असा कीं आपण अंधाऱ्या गल्लींत येऊन सांपडलों. चोराचा उपद्रव वाढत च चालला. कारण तो तर चोरी हा आपला धंदा च करून बसला. आपल्या लक्षांत आलें कीं यापेक्षां चोराचा उपद्रव सहन करून घ्यावा तें बरें; तसें केल्यानें चोराला समज येईल. एवढें सहन केल्यानें आपल्या लक्षांत आलें कीं चोर झाले तरी आपल्याहून निराळे नाहींत; आपले तर सर्व च आप्तेष्ट आहेत, मित्र आहेत; त्यांचें पारिपत्य कसलें करावयाचें ?

पण उपद्रव सहन करीत गेलों म्हणजे भागलें असें हि नाहीं. त्यापासून भ्याडपणा उद्भवण्याचा संभव आहे. यावरून आपलें आणखी विशेष कर्तव्य आपल्याला दिसून आलें. चोर हे जर आपलीं भावंडें, तर त्यांच्या हि मनामध्यें तशी भावना उत्पन्न केली पाहिजे. म्हणजे च आपण त्यांना आपलेसें करण्याचे उपाय शोधून काढण्याची तसदी घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हाच अहिंसेचा मार्ग. यामध्यें उत्तरोत्तर

दुःख ओढवून घेण्याचा च प्रश्न असतो; अमर्याद सहनशीलता च शिकावयाची असते. आणि जर तेवढें साधलें तर अखेरीस चोर साव बनतो; व आपल्याला सत्याचें अधिक स्पष्ट दर्शन होतें. अशा तऱ्हेनें आपण जगाला आपले मित्र बनविण्यास शिकत असतों; ईश्वराचा, सत्याचा, महिमा आपल्याला अधिक चांगल्या तऱ्हेनें कळून येतो; संकटांचा भार उचलावा लागत असला तरी हि शांतिसुख वाढत च जातें. आपल्यामध्यें साहस किंवा हिंमत वाढते. शाश्वत-अशाश्वतामधील भेद आपल्याला अधिक चांगल्या तऱ्हेनें कळतो; अभिमान गळतो: नम्रता वाढते; परिग्रह आपोआप च झडत जातो; आणि देहामध्यें सांठून राहिलेला मळ प्रत्यहीं कमी कमी होत जातो.

ही अहिंसा म्हणजे आज आपण जी स्थूल अहिंसा पाहतों ती नव्हे. कोणाला हि मारावयाचें नाहीं हें झालें च; परंतु प्रत्येक कुविचार म्हणजे

हिंसा होय. उतावळेपणा म्हणजे हिंसा; मिथ्या भाषण म्हणजे हिंसा; द्वेष हिंसा होय; कोणाचें वाईट चिंतणें म्हणजे सुद्धां हिंसा च. ज्याची लोकांना जरूर आहे तें आपल्या ताब्यांत ठेवणें ही सुद्धां हिंसा च आहे. पण आपण खातों तें जगाला पाहिजेच असतें. आपण उभे रहावें तेथें शेंकडों सूक्ष्म जंतु असतात व ते चिरडले जातात. ही जागा त्यांची आहे. तर मग काय आत्महत्या करावयाची? तिकडूनहि पार पडतां येत नाहीं. देहाला कवटाळण्याची वासना मनानें निःशेष सोडावी तेव्हां च देह शेंवटीं आपल्याला सोडील. ही निर्मोह अवस्था म्हणजे च सत्यनारायण. त्याचा साक्षात्कार उतावीळ बनून साधतां यावयाचा नाहीं. देह हा आपला नव्हे, आपल्या हातीं मिळालेली ती ठेव आहे, असें मानून त्याचा होईल तो उपयोग करावा आणि आपला मार्ग कापीत जावा.

मला लिहायचें होतें सोपें, लिहिलें गेलें कठिण. तरीहि ज्यानें अहिंसेचा थोडा तरी विचार केला आहे त्याला समजायला कठिण पडूं नये.

एवढें मात्र सर्वांनीं लक्ष्यांत घ्यावें: अहिंसेविना सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा व सत्य हीं एकमेकांशीं इतकीं जखडलेलीं आहेत कीं जशा कांहीं नाण्याच्या दोन बाजू; किंवा गुळगुळीत चकतीच्या दोन्ही बाजू; त्यांपैकीं सुलटी कोणती आणी उलटी कोणती ? तरी पण अहिंसेला आपण साधन म्हणावें व सत्याला साध्य. साधन आपल्या हातांतील गोष्ट आहे; म्हणून अहिंसा परम–धर्म झाली सत्य म्हणजे तर परमेश्वर. साधनाची काळजी घेतली तर कधीं काळीं तरी साध्याचें दर्शन घडेल च. एवढी प्रचीति पटली कीं जग जिंकलें. आपल्या मार्गांत वाटेल तीं संकटें येवोत, बाह्यतः पाहतां आपल्याला वाटेल तितकें अपयश येतेंसें दिसलें तरीहि आपण विश्वास न सोडतां एक च मंत्र जपत असावें

तो हा:-सत्य आहे, तेंच एक आहे.सत्य हाच परमेश्वर. त्याचा साक्षात्कार करण्याचा एक च मार्ग, एक च साधन म्हणजे अहिंसा. त्याच्याकडे कालत्रयीं पाठ फिरविणार नाहीं. ज्या सत्यरूप परमेश्वराच्या नांवानें ही प्रतिज्ञा केली आहे, तो च परमेश्वर तिचें पालन करण्याचें बळ देवो.

ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ब्रह्मचर्य

५-८-'३० ये. मं

आपल्या व्रतांपैकीं तिसरें व्रत ब्रह्मचर्याचें आहे. खरें पाहिलें असतां इतर सर्व व्रतें एका सत्याच्या व्रतामधून उत्पन्न झालीं आहेत, व त्याच्यासाठीं च त्यांचें अस्तित्व आहे. जो मनुष्य सत्याला च वाहिलेला आहे, त्याचीच उपासना करीत आहे, त्यानें दुसऱ्या कोणत्या हि वस्तूची आराधना केल्यास तो व्यभिचारी ठरणार; तर मग विकाराची आराधना त्याला शक्यच कशी असणार ? ज्याच्या एकूण एक हालचाली सत्याच्या दर्शनासाठीं योजिलेल्या आहेत, तो प्रजोत्पत्तीच्या किंवा गृहप्रपंच चालविण्याच्या कार्यामध्यें पडूं शकेल तरी कसा ? भोगविलासांनीं कोणाला सत्याची प्राप्ति झाल्याचा आजमितीपर्यंत आपल्यापाशीं एक हि दाखला नाहीं.

अथवा अहिंसेच्या पालनाची गोष्ट घेतली तरी तिचें पूर्ण पालन ब्रह्मचर्याखेरीज अशक्य आहे. अहिंसा म्हणजे सर्वव्यापी प्रेम. पुरुषानें एका स्त्रीला किंवा स्त्रीनें एका पुरुषाला आपलें प्रेम देऊन टाकलें कीं मग इतरांसाठीं त्याच्यापाशीं काय उरणार? त्याचा अर्थ च असा कीं "आपण दोघे प्रथम, बाकीचीं सर्व मागाहून." पतिव्रता स्त्री पतीसाठीं आणि पत्नीव्रत पुरुष पत्नीसाठीं सर्वस्वाचा होम करण्यास तयार असणार, अर्थात् त्यांच्याकडून सर्वव्यापी प्रेमाचें पालन होणें शक्य च नाहीं हें स्पष्ट आहे. अखिल सृष्टीला आपलें कुटुंब बनविणें हें त्यांच्याकडून घडण्यासारखें च नाहीं. कारण कीं त्यांच्यापाशीं 'स्वतःचें' मानलेलें असें एक कुटुंब हजर आहे, किंवा होऊं घातलेलें आहे. या संकुचित कुटुंबाची वाढ होईल त्या मानानें सर्वव्यापी प्रेमामध्यें विक्षेप होणार. असें प्रत्यक्ष घडत असलेलें आपल्याला सर्व जगभर दिसत च आहे. म्हणून

अहिंसा-व्रताचें पालन करणाराला विवाह शक्य नाहीं; विवाह-बाह्य विकाराविषयीं तर बोलायचें च काय ?

मग जीं विवाह करून चुकलीं आहेत त्यांचें काय ? त्यांना सत्य कधीं काळीं सांपडावयाचें च नाहीं कीं काय ? तीं कधीं च सर्वार्पण करूं शकणार नाहींत काय ? आपण त्यांच्यासाठीं हि मार्ग काढलेला च आहे. विवाहितांनीं अविवाहितांसारखें बनून जावें. या बाबतींत याच्यासारखी सुंदर स्थिति मी दुसरी कोणतीहि अनुभविलेली नाहीं. या स्थितीचा रस ज्यानें चाखला असेल तो च याची साक्ष देऊं शकेल. आजमितीला तर या प्रयोगाची सफलता सिद्ध होऊन चुकली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. विवाहित पतिपत्नी एकमेकांना भाऊबहिणी-प्रमाणें मानूं लागलीं कीं सर्व तऱ्हेच्या तापत्रयांतून तीं मुक्त झालीं. जगांतील प्रत्येक स्त्री आपली भगिनी आहे, आई आहे, कन्या आहे, हा विचार च माणसाला

एकदम उच्च स्थितीप्रत नेणारा, बंधनांतून मुक्ति देणारा होऊन जातो. यांत पतिपत्नीचें नुकसान कसलें च होत नाहीं; उलट तीं आपल्या भांडवलाची वृद्धि च करतात, आपल्या कुटुंबाचा विस्तार करतात, विकाररूपी मळ काढून टाकल्यानें प्रेमाची हि वाढ च करतात. विकाराचा लोप झाल्यामुळें एकमेकांची सेवा सुद्धां अधिक चांगल्या तऱ्हेनें होऊं शकते. एकमेकांमधें धुसफुशीचे प्रसंग कमी येतात. प्रेम जेथें स्वार्थी, संकुचित असतें तेथेंच धुसफुशीला अधिक सवड मिळते.

वरील मुख्य विचार केला व तो हृदयामध्यें ठसला, कीं मग ब्रह्मचर्यापासून होणाऱ्या शारीरिक लाभांचें, वीर्यलाभ इत्यादींचें महत्त्व त्या मानानें फार च अल्प वाटूं लागतें. जाणूनबुजून भोगविलासाखातर वीर्यहानि करणें व शरीराला खंगवून टाकणें हा केवढा मूर्खपणा म्हटला पाहिजे ? वीर्याचा उपयोग उभयतांची शारीरिक व मानसिक शक्ति वाढविण्या-

साठीं आहे. त्याचा विषयभोगार्थ उपयोग करणें हा त्याचा अत्यंत दुरुपयोग होय; व म्हणूनच त्यापासून अनेक रोग हि उद्‌भवत असतात.

असलें ब्रह्मचर्य कायावाचामनेंकरून पाळावयाचें असतें. हरएक व्रताचें असेंच आहे. जो शरीर तेवढें ताब्यांत ठेवतो पण मनानें विकारांचें पोषण करीत च राहतो तो मूढ, मिथ्याचारी होय असें आपण गीतेमध्यें[1] पाहिलें आहे. सर्वांना याचा अनुभव हि असतो. मनाला विकारी राहूं द्यायचें आणि शरीराला मात्र दाबण्याचा प्रयत्न करायचा, यापासून हानि च होणार. जिकडे मन गेलें तिकडे अखेरीला शरीर हि खेंचलें गेल्याखेरीज रहावयाचें च नाहीं. येथें एक फरक मात्र लक्षांत घेण्याची आवश्यकता आहे. मनाला विकारवश होऊं देणें निराळें, आणि मन आपण होऊन, आपल्या इच्छेविरुद्ध, बलात्कारानें विकारी होणें, किंवा वारंवार होत

---

१ अध्याय ३, श्लोक ६ –अनुवादक.

राहणें, हें निराळें. मनाच्या या विकारवशतेला आपण सहायभूत होत नसलों म्हणजे अखेरीस आपला विजय च आहे. शरीर आपल्या ताब्यांत राहतें, मन नाहीं रहात, असा आपल्याला क्षणोक्षणीं अनुभव येतो. म्हणून शरीराला तरी चटकन कह्यांत आणून, मनाला कह्यांत आणण्याचा नित्य प्रयत्न करीत असावें, म्हणजे आपण आपलें कर्तव्य केल्याप्रमाणें होईल. परंतु आपण मनाचे ताबेदार झालों कीं शरीर आणि मन यांचा बेबनाव झाला व मिथ्याचाराला सुरवात झाली असें समजावें. जोंपर्यंत आपण मनोविकार दाबण्याचा प्रयत्न करीत आहों तोंपर्यंत शरीर व मन दोन्ही एका च दिशेकडे वळलेलीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या ब्रह्मचर्याचें पालन फार बिकट, जवळजवळ अशक्य आहे अशी सर्वसाधारण समजूत असते. याच्या कारणांचा शोध करतां असें दिसून येतें कीं ब्रह्मचर्याचा संकुचित अर्थ करण्यांत आला आहे.

जननेंद्रियविकाराचा निरोध म्हणजे च ब्रह्मचर्याचें पालन अशी समजूत होऊन बसली आहे. मला तर असें वाटतें कीं ही व्याख्या चुकीची व अपूर्ण आहे. यच्चयावत् विषयांचा निरोध म्हणजे च ब्रह्मचर्य होय. जो इतर सर्व इंद्रियांना वाटेल तिकडे भटकूं देऊन एका इंद्रियाला तेवढें अडवून धरण्याचा प्रयत्न करतो तो निष्फळ प्रयत्न करीत आहे यांत संशय कसला ? कानांनीं विकारोत्तेजक गोष्टी ऐकावयाच्या, डोळ्यांनीं विकार उत्पन्न करणाऱ्या वस्तु पहावयाच्या, जिभेनें विकारोत्तेजक पदार्थ चाखावयाचे, हातानें विकारोत्पादक वस्तूंना स्पर्श करावयाचा, आणि इतकें करून जननेंद्रिय दाबून ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा म्हणजे आगींत हात घालावयाचा, मात्र तो पोळूं नये अशी इच्छा करावयाची, अशांतला प्रकार झाला. म्हणून जो जननेंद्रियाचा संयम करण्याचा निश्चय करतो त्यानें एकूण एक इंद्रियांचा त्यांच्या त्यांच्या विकारांपासून संयम करण्याचा

निश्चय केलेला असलाच पाहिजे. मला वारंवार वाटत असतें कीं ब्रह्मचर्याच्या संकुचित व्याख्येमुळें नुकसान झालेलें आहे. माझा असा दृढ अभिप्राय आहे, आणि अनुभवहि आहे कीं जर आपण सर्व इंद्रियांना एकदमच आहारीं आणण्याचा सराव पाडीत गेलों तर जननेंद्रियाला ताब्यांत आणण्याच्या प्रयत्नांत त्वरित सफलता मिळते. यामध्यें मुख्य प्रश्न स्वादेंद्रियाचा आहे, आणि म्हणूनच त्याच्या संयमनाला आपण स्वतंत्र स्थान दिलें आहे. त्याचा पुढें विचार करूं.

ब्रह्मचर्याचा मूळ अर्थ सर्वांनीं लक्षांत ठेवावा. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्माच्या—सत्याच्या—शोधार्थ चर्या म्हणजे तत्संबंधीं आचरण. या मूळ अर्थातून सर्वेन्द्रिय-संयम हा विशेष अर्थ निघतो; ‘केवळ जननेंद्रियाचा संयम’ असला अपुरा अर्थ तर आपण विसरूनच जावें.

० ० ०

# अस्वाद

ता. २१-८-'३०
मंगल-प्रभात

ब्रह्मचर्याशीं अगदीं निकटचा संबंध असलेलें असें हें व्रत आहे. माझा असा अनुभव आहे कीं हें व्रत हस्तगत झालें तर ब्रह्मचर्य, म्हणजे जननेंद्रियसंयम, अगदीं सुलभ होऊन जाईल. पण सामान्यपणें याची व्रतांमध्यें स्वतंत्रपणें गणना होत नसते. स्वादाला मोठमोठे मुनिवरहि जिंकू शकले नाहींत, म्हणूनच त्याला स्वतंत्र स्थान मिळालें नाहीं. हा केवळ माझा तर्क आहे. तो बरोबर असो किंवा चुकीचा असो; आपण तरी त्याला स्वतंत्र स्थान दिलेलें आहे. त्या अर्थी त्याचा विचार स्वतंत्रपणें करणें उचित होय.

अस्वाद म्हणजे स्वाद न घेणें. स्वाद म्हणजे रुचि. ज्याप्रमाणें औषध घेतेवेळीं आपण तें स्वादिष्ट आहे किंवा कसें याचा विचार न करतां शरीराला त्याची

जरूर आहे असें समजून ठराविक प्रमाणांत खातों, त्याचप्रमाणें अन्नाविषयीं समजावें. अन्न म्हणजे एकूण एक खाद्य पदार्थ. अर्थात् दूध, फळें इत्यादिहि अन्नामध्यें आलीं. औषध ज्याप्रमाणें कमी प्रमाणांत घेतलें तर परिणाम करीत नाहीं, किंवा थोडा करतें, आणि प्रमाणाबाहेर घेतलें तर हानि करतें, तसेंच अन्नाचेंहि आहे. म्हणून कोणतीहि वस्तु तिची रुचि घेण्यासाठीं चाखणें हा या व्रताचा भंग होय. रुचकर वाटणारी वस्तु प्रमाणाबाहेर खाणें हा तर उघडच भंग आहे. यावरून लक्षांत येईल कीं एखाद्या जिनसेची चव वाढविण्यासाठीं किंवा बदलण्यासाठीं किंवा वाईट चव मोडण्यासाठीं त्या जिनसेंत मीठ घालणें हाहि व्रताचा भंग होय. परंतु अन्नामध्यें अमुक एका प्रमाणांत मीठ घालणें आवश्यक आहे असें आपल्याला माहीत असेल व तदनुसार त्यामध्यें आपण मीठ घालीत असूं तर तो व्रतभंग होत नाहीं. शरीरपोषणासाठीं अवश्यकता

नसतांहि मनाला फसविण्यासाठीं अवश्यकतेचें आरोपण करून अमुक वस्तु अन्नांत घालणें म्हणजे तर मिथ्याचारच होतो म्हटलें पाहिजे.

या पद्धतीनें विचार केल्यास आपल्याला दिसून येईल कीं आपण खातों पितों त्यामध्यें अशा अनेक वस्तु आहेत कीं त्या आवश्यक नसल्यामुळें त्याज्य ठरतात आणि अशा तऱ्हेनें असंख्य वस्तूंचा त्याग ज्याच्या बाबतींत स्वाभाविक होऊन जाईल त्याचे एकंदर विकार शांत होतील. ' एक तोलडी तेर वानां मागे छे, ' ( एक मडकी तेरा जिन्नस मागते. ) ' पेट करावे वेठ ', (पोटासाठीं वेठ) ' पेट वाजां वगडावे, ' (पोट वाजंत्रें वाजवायला लावतें) या सर्व म्हणींमध्यें खूप अर्थ भरलेला आहे. या विषयाकडे इतकें कमी लक्ष दिलें गेलें आहे कीं व्रताच्या दृष्टीनें अन्नाची[1]

---

१ साधकाला या बाबतींत कोणी मार्गदर्शक नाहीं या अर्थानें ? कीं निवड करणाराची ' मोठा आला शाहणा !' म्हणून थट्टा करण्यांत येईल म्हणून ( शंका ) –अनुवादक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

[illegible] करणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे. [illegible] शिवाय लहानपणापासूनच [illegible] खोट्या प्रेमाला बळी पडून अनेक प्रकारचे जिह्वा-विलास करवून शरीर बिघडवून टाकतात आणि जिभेला कुत्रीसारखी [ताळतंत्र सुटलेली]करून सोडतात. त्याचा परिणाम असा होतो कीं वाढती पिढी शरीरानें रोगट व रुचीच्या बाबतींत अतिशय बिघडून गेलेली अशी दिसून येते. याचे कडु परिणाम पावलोपावलीं आपल्या अनुभवाला येतात. अनेक खर्चांत आपण पडतों, वैद्यडॉक्टरांच्या मागें लागतों आणि शरीर व इंद्रियें आपल्या कह्यांत ठेवण्याऐवजीं उलट त्यांचेच गुलाम बनून जाऊन पंगुवत् आयुष्य कंठितों. एका आनुभविक वैद्यानें म्हटलें आहे कीं सबंध जगांत आपल्याला एकहि निरोगी मनुष्य आढळलेला नाहीं. थोडासाहि स्वाद घडला कीं त्या क्षणींच शरीर भ्रष्ट झालें, आणि त्या क्षणापासूनच शरीराच्या बाबतींत उपवासाची आवश्यकता उत्पन्न झाली, असें समजावें.

या विचारपद्धतीमुळें कोणीं घाबरून जाण्याचें कारण नाहीं. अस्वादव्रताचा बिकटपणा पाहून तें सोडून देण्याचेंहि कारण नाहीं. आपण कोणतेंहि एक व्रत घेतलें म्हणजे त्या वेळेपासूनच त्याचें संपूर्णपणें पालन करू लागलों असा अर्थ नव्हे. व्रत घेणें म्हणजे त्याचें संपूर्ण पालन करण्याचा प्रामाणिक, दृढ प्रयत्न काया-वाचा-मनेंकरून मरेपर्यंत करणें. अमुक एक व्रत कठिण आहे म्हणून त्याची व्याख्याच ढिली करूं नये. कारण तसें करण्यामध्यें आत्मवंचना आहे. आपल्या सोईखातर आदर्शालाच खालीं ओढण्यामध्यें खोडसाळपणा आहे, आपलें पतन आहे. आदर्श स्वतंत्रपणें नक्की करावा व मग तो किती हि कठिण असला तरी त्याच्यापर्यंत पोंचण्याचा, प्राण गेला तरी पण, प्रयत्न करीत रहावें हाच परम अर्थ होय — पुरुषार्थ होय. (पुरुष शब्दाचा अर्थ केवळ नर असा न करतां मूळ अर्थ घ्यावयाचा आहे. पुरामध्यें म्हणजे शरीरामध्यें वास

करतो तो पुरुष. अशा तऱ्हेनें अर्थ लावला म्हणजे पुरुष याचा उपयोग नर-नारी उभयतांसाठींहि करतां येतो.) जो पुरुष महाव्रतांचें संपूर्णपणें व तिन्ही काळीं पालन करण्यास समर्थ आहे त्याला इहलोकीं कांहीं करावयाचें राहत नाहीं; तो भगवान होय. तो मुक्त आहे. आपण तर अल्प, मुमुक्षु, जिज्ञासु, सत्याचा आग्रह धरणारे, त्याचा शोध करीत असलेले प्राणी आहों. म्हणून आपलें काम गीता म्हणते त्याप्रमाणें धीमे धीमे, पण अतंद्रित राहून, प्रयत्न करीत जाणें हेंच होय. असें करीत गेल्यास कधीं काळीं आपण प्रभूच्या कृपेला लायक बनूं व त्यावेळीं आपले सर्व रस जळून जातील.

अस्वादव्रताचें महत्त्व आपल्याला पटलें असेल तर आपण त्याचें पालन करण्याच्या प्रयत्नाला नव्या जोमानें लागलें पाहिजे. त्यासाठीं चोवीसहि तास खाण्याचेच विचार करीत बसण्याची आवश्यकता नसते. केवळ सावधगिरीची, जागरूकतेची, अत्यंत

आवश्यकता असते. असें करीत गेल्यानें थोडक्याच काळांत आपण स्वाद कोठें करीत असतों आणि कोठें शरीराच्या पोषणासाठीं खात असतों हें समजत जाईल. हें समजूं लागल्यावर आपण दृढतापूर्वक स्वाद कमी करीत जावें. या दृष्टीनें विचार केल्यास एकत्र स्वयंपाक—मात्र तो अस्वादवृत्तीनें करण्यांत येत असला पाहिजे—हा फार उपयोगी होतो. तेथें आपल्याला रोज आज काय खावें, किंवा रांधावें, याचा विचार करीत बसावें लागत नाहीं. पण जें तयार करण्यांत आलें असेल व जें आपल्याला त्याज्य नसेल तें ईश्वराचा प्रसाद समजून, मनांतूनहि त्याचे दोष न काढतां, संतोषपूर्वक, शरीराला आवश्यक असेल तेवढें खाऊन उठावें. जो असें करतो त्याच्याकडून अस्वाद-व्रताचे पालन सहजींच घडतें. एकत्र स्वयंपाकाचे कर्ते आपला भार हलका करतात, आपल्या व्रतांचें ते रखवालदार बनतात. स्वयंपाक्यांनीं जेवणारांना चवदार

जेवण घालण्याच्या दृष्टीने कोणताहि पदार्थ बनवूं नये; केवळ संघाच्या घटकांच्या शरीरपोषणार्थच स्वयंपाकाची सिद्धता करावी. खरें पाहतां आदर्श स्थितीमध्यें विस्तवाची जरूरी कमींत कमी पडावी, किंवा मुळींच पडूं नये. सूर्यरूपी महान अग्नि ज्या वस्तू शिजवितो त्यांतूनच आपल्या खाद्याची निवड व्हावी. आणि या दृष्टीनें विचार केल्यास मनुष्यप्राणी केवळ फलाहारी आहे असें सिद्ध होतें. पण इतक्या खोलांत शिरण्याची येथें आवश्यकता नाहीं. येथें तर अस्वादव्रत म्हणजे काय, त्यांत कोणकोणत्या अडचणी आहेत किंवा नाहींत, तसेंच ब्रह्मचर्यपालनाशीं त्याचा कीती निकटचा संबंध आहे तेवढ्याचाच विचार करावयाचा होता. एवढें मनांत ठसल्यानंतर सर्वांनीं यथाशक्ति या व्रतांत सिद्धि मिळविण्याचा शुभ प्रयत्न करावा.

० ० ०

# अस्तेय

१९-८-'३०, ये. मं.

मंगळप्रभात

आतां आपण अस्तेयाकडे वळूं या. खोल विचार केल्यास आपल्या लक्षांत येईल कीं सर्व व्रतें सत्य व अहिंसेमध्यें किंवा सत्यामध्येंच अंतर्भूत आहेत. तें अशा तऱ्हेनें दाखवितां येईल :—

सत्य — अहिंसा अथवा सत्य — अहिंसा

ब्रह्मचर्य, अस्वाद, अस्तेय, अपरिग्रह, अभय वगैरे

जेवढें लांबवावें तेवढें. सत्यांतून अहिंसा काढावी अथवा सत्य-अहिंसा ही जोडी समजावी.

दोन्ही एकच; तरी पण माझ्या मनाचा कल पहिल्या गोष्टीकडे आहे. शिवाय अखेरची स्थिति तर जोडीच्या, द्वंद्वाच्या पलीकडची आहे. परम सत्य दुसऱ्या कशाच्या आश्रयाखेरीज उभें राहूं शकतें. सत्य साध्य आहे, अहिंसा साधन आहे. अहिंसा म्हणजे काय तें आपल्याला कळूं शकतें, पण पालन कठिण आहे. सत्य आपल्याला अंशतःच कळतें; संपूर्ण ज्ञान देहधाऱ्याला कठिण आहे, तसें अहिंसेचें संपूर्ण पालनहि देहधाऱ्याला कठिण आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणें. जो चोरी करतो त्याला सत्य कळतें किंवा प्रेमधर्माचें त्याचेकडून पालन होतें असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. तरीहि असें खरें कीं चोरीचा दोष आपण सर्वच थोड्याबहुत अंशीं जाणतां अजाणतां करीत असतों. परक्याची वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेणें ही तर चोरी खरीच. पण स्वतःची समजली जाणारी वस्तुहि मनुष्य चोरूं शकतो:- जसें बापानें आपल्या मुलाच्या

न कळत, त्यांना कळूं नये अशा हेतूनें, गुपचूप कांहीं खावें. आश्रमाचें कोठार हें आपलें सर्वांचें आहे असें म्हणतां येईल. पण त्यांतून जो कोणी गुपचूप गुळाचा बारका खडाहि तोंडांत टाकील तो चोर होय. एक मुलगा दुसऱ्याची लेखणी घेतो म्हणजे चोरीच करतो. त्यानें ती घेतली हें त्या दुसऱ्या इसमाला माहीत असेना कां, पण कसलीहि वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेणें म्हणजे सुद्धां चोरीच होय. वस्तूला कोणी मालक नाहीं, असें म्हणून ती घेण्यामध्यें चोरी होते. म्हणजे आपल्याला रस्त्यांत सांपडलेल्या वस्तूवर आपली मालकी नाहीं, तर त्या प्रदेशाचा राजा किंवा जें सरकार असेल त्याचीच होय. आश्रमाच्या जवळपास कोणतीहि वस्तु सांपडली तर ती आश्रमाच्या व्यवस्थापकाकडे दिली पाहिजे. व्यवस्थापक, जर ती आश्रमाची नसेल तर शिपायाच्या स्वाधीन करील.

येथपर्यंतचें समजायला त्या मानानें सोपें आहे.

पण अस्तेयव्रताची मजल याच्या पुष्कळ पुढें जाते. कोणती एकादी वस्तु घेण्याची आपल्याला अवश्यकता नाहीं असें असतां ती ज्याच्या ताब्यांत असेल त्याच्यापासून, त्याची परवानगी घेऊन कां होईना, घेणें म्हणजे चोरी होय. अवश्यक अशी एकहि वस्तु घेतां कामा नये. असली चोरी जगांत अधिकांत अधिक खाण्याच्या पदार्थांची घडत असते. मला अमुक प्रकारच्या फळांची जरूर नाहीं. तरीहि मी तीं खाल्लीं, किंवा जरूरीहून अधिक खाल्लीं कीं ती चोरी झाली. खरोखरी आपली गरज केवढी आहे तें आपल्याला कळत नाहीं, किंवा आपण बहुतेक सर्व च जण आपली गरज असली पाहिजे त्याहून अधिक फुगवून ठेवतों. म्हणजे च आपण अजाणतां चोर बनत असतों. विचार केला असतां आपल्याला आढळून येईल कीं आपल्या पुष्कळशा गरजांना आपण संक्षेप देऊ शकतों. अस्तेयव्रताचें पालन करणारा इसम उत्तरोत्तर आपल्या गरजा कमी करीत जाईल. या

जगांतील पुष्कळसें दारिद्य अस्तेयाच्या भंगामुळें उत्पन्न झालेलें आहे.

वर दर्शविलेल्या या सर्व बाह्य किंवा शारीरिक चोऱ्या म्हणतां येतील. याहून सूक्ष्म व आत्म्याला खालीं पाडणारी कींवा राखणारी चोरी म्हणजे मानसिक चोरी होय. मनानें आपण कोणाची वस्तु मिळविण्याची इच्छा केली किंवा नजरेनें जरी ती उष्टावली तरी ती चोरी च होय. मोठ्या माणसांना काय किंवा मुलांना काय, एखादी चांगली वस्तु पाहून ती हवीशी वाटणें म्हणजे मानसिक चोरी होय. उपवास करणारा मनुष्य शरीरानें खात नाहीं खरा, पण दुसऱ्याला जेवतांना पाहून मनानें स्वादाचें सेवन करीत असेल तर त्यानें चोरी च केली व आपला उपवास मोडला. जो मनुष्य उपवास चालू असल्या अवधींत, पारण्याच्या वेळीं काय काय खायचें याच्याच योजना करीत असतो तो अस्तेयव्रताचा व उपवासाचाहि भंग च करीत असतो, असें म्हणण्यास

हरकत नाही. अस्तेयव्रताचें पालन करणारा इसम भविष्यकाळीं मिळवावयाच्या वस्तूंच्या चिंतनाच्या भोंवऱ्यांत पडणार च नाहीं. पुष्कळशा चोऱ्यांच्या मुळाशीं असली उष्टी वासना च असल्याचें आढळून येईल. आजला ती फक्त विचारांत च राहिलेली असेल, पण ती तृप्त करण्यासाठीं उद्यां आपण भलेबुरे उपाय योजण्यांत गर्क होऊन जाणार च.

आणि जशी वस्तूंची चोरी होते तशीच विचांराची हि चोरी होऊं शकते. अमुक एक चांगला विचार मुळांत स्वतःला सुचलेला नसतां आपल्याला च तो सुचला असें जो प्रौढी मिरवून दर्शवितो तो विचाराची चोरी करतो. असली चोरी पुष्कळ विद्वानांनींहि दुनियेच्या इतिहासांत केलेली आहे आणि आजमितीला चालत आहे. समजा कीं आंध्रामध्यें मीं एक नवीन नमुन्याचा चरखा पाहिला. तसला च चरखा मीं आश्रमांत बनविला आणि मग सांगत सुटलों कीं हा माझा शोध. यांत मीं उघड च

दुसऱ्यानें केलेल्या शोधाची चोरी केली, असत्य तर पदरीं घेतलें च आहे.

म्हणून अस्तेयव्रताचें पालन करणाराला फार च नम्र, फार च विचारी, फार सावध, फार च साधें व्हावें लागत असतें.

० ० ०

# अपरिग्रह

२६-८-'३० य. मं.
मंगल-प्रभात

अपरिग्रह हें अस्तेयाशीं मिळतें व्रत आहे असें म्हणतां येईल. मुळांत न चोरलेल्या वस्तूचा हि जरूरी नसतांना संग्रह करून ठेवल्यानें ती चोरीच्या मालासारखी होऊन जाते. परिग्रह म्हणजे संचय किंवा एकत्र करणें. सत्यशोधक, अहिंसक परिग्रह करूं शकत नाहीं. परमात्मा परिग्रह करीत नाहीं. त्याला 'हव्या वाटणाऱ्या' वस्तु तो रोजच्या रोज निर्माण करतो. म्हणून आपला जर परमात्म्यावर विश्वास असेल तर आपण समजून असावें कीं आपल्याला लागणाऱ्या वस्तु तो रोजच्या रोज देत असतो, देत जाईल हि. अवलियांचा, भक्तांचा, असा अनुभव आहे. रोजच्या पुरतें च निर्माण करण्याचा हा ईश्वरी नियम आपल्याला माहीत नसतो, अथवा

माहीत होऊन हि आपण त्याचें पालन करीत नाहीं. त्यामुळें जगामधें विषमता व विषमतेपासून उद्भवणारीं दुःखें, आपल्याला अनुभवावीं लागतात. धनाढ्य इसमाच्या घरीं त्याला जरूर नसलेल्या वस्तु सांठलेल्या असतात, अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, कुजत असतात. तर इकडे त्यांच्या अभावीं करोडों गोर-गरीब रडत असतात, भुकीं मरत असतात, थंडीनें गारठत असतात. सर्वांनीं आपल्यास जरूर तेवढा च संग्रह केला तर कोणाला च वाण पडणार नाहीं, व सर्वांना च संतोष लाभेल. आज तरी दोघांच्या हि मागें भीक लागलेली आहे. कोट्यधीश असतो तो अब्जाधीश होऊं पाहतो, आणि तेवढ्या-वर हि त्याला संतोष होत नाहीं. कंगाल असतो तो कोट्यधीश होण्याची इच्छा करतो. कंगाल इसमाला पोटापुरतें मिळालें तर तेवढ्यानें त्याला संतोष झाला असें हि दिसत नाहीं.

पण कंगालाला पोटापुरतें मिळणें हा त्याचा हक्क

आहे, आणि त्याला तेवढें मिळेलसें करून देणें समाजाचें कर्तव्य आहे. म्हणून त्याला संतोष व्हावा, व आपल्याला हि व्हावा, यासाठीं धनाढ्य लोकांनीं पुढें सरलें पाहिजे. त्यानें आपला फाजील परिग्रह सोडून दिला तर कंगालाला स्वतःपुरतें सहजीं मिळून जाईल व दोन्ही पक्ष संतोषाचा धडा शिकतील. आदर्शभूत निःसीम अपरिग्रह तर जो मनानें व कर्मानें दिगंबर आहे त्याचा च होय. म्हणजे तो पक्ष्याप्रमाणें घराशिवाय, वस्त्राखेरीज व अन्नाखेरीज फिरत राहील. अन्न म्हणाल तर त्याला लागेल तेवढें रोजच्या रोज भगवान् पुरवीत जाईल. असल्या अवधूत स्थितीला क्वचित च कोणी पोचणार. आपण पडलों सामान्य दर्जाचे सत्याग्रही, जिज्ञासु. आपण आदर्शावर नजर ठेवून आपला परिग्रह नित्य तपासीत जावें व होईल तोंपर्यंत कमी कमी करीत जावें. खऱ्या सुधारणेचें, खऱ्या संस्कृतीचें, लक्षण परिग्रहाची वाढ नसून त्याचें विचारपूर्वक व इरादापूर्वक आकुं-

चन करणें हें च होय. आपण जसजसें परिग्रहाचा छेद करीत जातों तसतसें खरें सुख व खरा संतोष हीं वाढत जातात, सेवाशक्ति वाढते.

अशा तऱ्हेनें विचार करून तदनुसार वागूं लागल्यास आपल्याला दिसून येईल कीं आश्रमामधें आपण पुष्कळसा असला संग्रह करीत असतों कीं ज्याची आवश्यकता सिद्ध करतां यावयाची नाहीं; आणि अशा अनावश्यक परिग्रहामुळें आपण शेजाऱ्याला चोरी करण्याच्या मोहांत पाडीत असतों. अभ्यासानें मनुष्य आपल्या गरजा कमी करूं शकतों; आणि जसजसा तो त्या कमी करीत जातो तसतसा तो सुखी, शांत, व सर्व दृष्टींनीं आरोग्यवान्, बनत असतो. केवळ सत्याच्या, आत्म्याच्या दृष्टीनें विचार केल्यास शरीर सुद्धां परिग्रह च आहे. भोग-लालसेपायीं आपण शरीराचें आवरण उभें केलें आहे व तें टिकवून धरीत आहों. भोगेच्छा पार क्षीण झाली कीं मग शरीराची आवश्यकता राहत नाहीं, म्हणजे मनु-

घ्याला नवीन देह धारण करावयाचा राहत नाहीं. आत्मा सर्वव्यापी आहे; मग त्यानें शरीररूपी पिंजऱ्यामधें स्वतःला कां कोंडून घ्यावें? हा पिंजरा टिकवून धरण्यासाठीं नाहीं नाहीं त्या गोष्टी कां कराव्या? दुसऱ्यांना कां मारावें? या दिशेनें विचार केला असतां आपण आत्यंतिक त्यागाशीं येऊन पोचतों, आणि असा धडा शिकतों कीं शरीर असेल तोंपर्यंत त्याचा उपयोग केवळ सेवेसाठीं करावा आणि तो येथपर्यंत कीं सेवा हा च त्याचा खराखुरा आहार होऊन रहावा. शरीरानें खायचें, प्यायचें, पडायचें, बसायचें, जागायचें, झोंपायचें, तें सर्व कांहीं सेवेसाठीं च. यापासून उद्भवणारें सुख हें च खरें सुख होय, व असें करणाऱ्या मनुष्याला अखेरीस सत्याचें दर्शन होणार च. या दृष्टीनें आपण सर्वांनीं आपला परिग्रह तपासावा.

एवढें हि ध्यानांत बाळगणें योग्य आहे कीं ज्याप्रमाणें वस्तूंचा त्याप्रमाणें च विचारांचा हि अपरिग्रह

घडला पाहिजे. जो मनुष्य आपल्या मेंदूमध निरर्थक ज्ञान सांठवून ठेवतो तो परिग्रही होय. जे विचार आपल्याला ईश्वरापासून विन्मुख ठेवतात, किंवा जे आपल्याला ईश्वरासन्निध घेऊन जात नाहींत, त्यांची परिग्रहामधें च गणना होते; अर्थात् ते त्याज्य च आहेत. ज्ञानाची अशा तऱ्हेची व्याख्या भगवंतांनीं तेराव्या अध्यायांत दिली आहे. तिचा या ठिकाणीं विचार करणें उचित आहे. अमानित्व इत्यादि गुणांची यादी देऊन भगवान् म्हणतात कीं या व्यतिरिक्त तें सर्व अज्ञान होय. हें वचन खरें असेल—आणि खरें तर आहे च—तर मग आज आपण ज्ञानाच्या नांवाखालीं जें सांठवून धरतों तें पुष्कळसें खरोखरी अज्ञान च आहे. व त्यापासून लाभ होण्याऐवजीं हानि च होत असते. डोकें फिरूं लागतें, अखेरीस पोकळ होतें; असंतोष फैलावतो व अनर्थ वाढतात. यावरून कोणी मंदतेचें मात्र समर्थन करूं नये. प्रत्येक क्षण कामांत च गेला

पाहिजे. एवढें च कीं तें काम सात्त्विक असावें, सत्याकडे घेऊन जाणारें असावें. ज्यानें सेवाधर्म पत्करला त्याला एक क्षण सुद्धां आळसांत घालविण्याची मोकळीक नाहीं. सार व असार यांमधील भेद मात्र लक्षांत घेतला पाहिजे. सेवापरायण इसमाला हा विवेक सहजीं प्राप्त होतो.

ग्रंथ संग्रहालय
क्र. ६२८४

# अभय

ता. २-९-'३०

मंगल-प्रभात

याची गणना सोळाव्या अध्यायांत दैवी संपत्तीचें वर्णन करतांना भगवंतांनीं प्रथम केली आहे, ती श्लोक रचण्याच्या सोयीसाठीं, कीं अभयाला प्रथम स्थान च मिळालें पाहिजे म्हणून, याच्या वादांत मी शिरत नाहीं; त्याचा निर्णय करण्याची माझ्यांत ताकद हि नाहीं. माझ्या समजुतीनें, अभयाला सहजीं च प्रथम स्थान मिळालें असलें तरी तें यथायोग्य च आहे. अभयाच्या अभावीं इतर संपत्ति हातीं लागणार च नाहीं. अभयाखेरीज सत्याचा शोध व्हावा च कसा ? अभयाखेरीज अहिंसेचें पालन कसें होणार ? "हरिनो मारग छे शूरानो नहि कायरनुं काम जोने[1] !" सत्य म्हणजे च

---

१ मागें पान ५ टीप पहा. —अनुवादक

हरि, राम, नारायण, वासुदेव, कायर म्हणजे भयभीत, भ्याड. 'शूर' म्हणजे भमुयक्त; तरवारीचें हात वगैरे शिकलेला नव्हे. तरवार ही शूराचें चिह्न नव्हे, भीतीचें चिह्न आहे.

अभय म्हणजे सर्व तऱ्हेच्या बाह्य भयांपासून मुक्ति. मृत्यूचें भय, धनदौलत चोरीस जाण्याचें भय, कुटुंबपरिवारासंबंधींचें भय, रोगाचें भय, शस्त्र-प्रहाराचें भय, अब्रूचें भय, कोणी नाराज होईल याचें भय, अशा तऱ्हेनें भयांची वंशावळ वाटेल तेवढी लांबवितां येईल. केवळ एका मृत्यूचें भय जिंकलें कीं सर्व भयें जिंकलीं असें सामान्यतः म्हटलें जातें. पण तें बरोबर दिसत नाहीं. पुष्कळ जणांनीं मृत्यूचें भय सोडलेलें असतें. पण ते इतर अनेक प्रकारच्या दुःखांपुढें पळ काढतात. कोणी स्वतः जिवावर उदार असतात पण आप्तेष्टांचा वियोग त्यांना सहन करवत नाहीं. एकादा कृपण हें सर्व जाऊं देईल, प्रत्यक्ष देहावर पाणी सोडील,

पण सांठविलेलें धन सोडतांना त्याचा जीव कासावीस होईल. कोणी स्वतःची मानीव अब्रू किंवा प्रतिष्ठा संभाळून धरण्यासाठीं अनेक भलींबुरीं कर्में करायला उद्युक्त होईल, व करील हि. लोकनिंदेच्या भयानें, सरळ मार्ग दिसत असतां हि, कोणी तो स्वीकारण्यास कांकूं करील. सत्याचा शोध करणारानें या सर्व भयांना गचांडी दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हरिश्चंद्राप्रमाणें सर्वस्वाची पायमल्ली करून घेण्याची त्याची तयारी असली पाहिजे. हरिश्चंद्राची कथा काल्पनिक कां असेना, पण प्रत्येक आत्मार्थी इसमाचा असा च अनुभव आहे. अर्थात् या कथेची किंमत कोणत्या हि ऐतिहासिक कथेपेक्षां अनंत पटीनें अधिक आहे व ही कथा आपण सर्वांनीं हृदयाशीं धरण्यासारखी, मनन करण्यासारखी आहे.

अभयव्रताचें संपूर्ण पालन जवळ जवळ अशक्य आहे. सर्व तऱ्हेच्या भयांमधून मुक्तता एक त्याला च लाभेल कीं ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.

अभय ही निर्मोह स्थितीची पराकाष्ठा होय. निश्चय केल्यानें, सतत प्रयत्न केल्यानें आत्म्यावरील श्रद्धा वाढत गेल्यानें, अभयाचें प्रमाण वाढूं शकेल. मीं आरंभी च म्हटलें कीं आपल्याला बाह्य भयांपासून मुक्तता मिळवावयाची आहे. अंतरांत वास करणारे जे शत्रु त्यांना तर भिऊन च चाललें पाहिजे. काम-क्रोधादिकांचें भय हें च खरेंखुरें भय होय. त्यांना जिंकलें तर भीतिदायक बाह्य वस्तूंचा उपद्रव आपोआप नाहींसा होईल. सर्व भीति एका देहामुळें आहे. देहावरील ममता झडली तर अभय सहजीं प्राप्त होईल. अशा तऱ्हेनें विचार केला असतां आपल्या लक्षांत येईल कीं सर्व भयें आपल्या कल्पनेचे खेळ आहेत. पैशामधून, कुटुंबामधून, शरीरामधून 'माझे' पणा काढून टाकला कीं मग भय राहिलें च कोठें ? **तेन त्यक्तेन भुंजीथाः**[1] हें रामबाण वचन आहे. कुटुंब, पैसा, देह, आहेत

---

[1] ईशावास्योपनिषदाचे आरंभी. —अनुवादक

तशीं च राहणार. आमची त्यांच्याबद्दलची कल्पना बदलली म्हणजे झालें. तीं ‘ आपलीं ’ नव्हत, ‘ माझीं ’ नव्हत; तीं ईश्वराचीं आहेत; ‘ मी ’ सुद्धां त्याचा च आहें. माझें असें या जगांत कांहीं च नाहीं. मग मला डर ती कसची ? म्हणून च उपनिषत्कारानें म्हटलें आहे: ‘त्याचा त्याग करून उपभोग घे.’ म्हणजे आपण त्यांचें रखवालदार म्हणून रहावें. तो ईश्वर च आपल्याला त्यांचें रक्षण करण्यापुरती शक्ति व सामुग्री देईल. अशा तऱ्हेनें धनीपणा सोडून चाकर बनलों, शून्यवत् होऊन गेलों, तर सहजीं च सर्व भयें जिंकूं, सहजीं च शांति प्राप्त करूं, सत्यनारायणाचें दर्शन करूं.

o o o

# अस्पृश्यता-निवारण

ता. ९-९-'३०
मंगल-प्रभात

हें व्रत हि अस्वादव्रताप्रमाणें नवीन आहे. आणि कांहींसें विचित्र हि वाटेल. विचित्र आहे त्याहून आवश्यक अधिक आहे. अस्पृश्यता म्हणजे शिवाशीव. आणि अखा भगतानें म्हटलें आहे तें योग्य च आहे कीं 'आभडछेट अदकेरूं अंग.' ( शिवाशीव लुल्या अवयवाप्रमाणें आहे. ) ही धर्माच्या नांवाखालीं, किंवा धर्माचें सोंग आणून, धर्मामधें च जेथें तेथें विघ्न आणीत असते, व धर्माला कलुषित करते. आत्मा जर एक च आहे, ईश्वर एक च आहे, तर मग अस्पृश्य कोणी च नाहीं. ज्याप्रमाणें धेडभंग्यांना अस्पृश्य लेखण्यांत येतें पण ते अस्पृश्य नाहींत, त्याप्रमाणें च मृत देह सुद्धां अस्पृश्य नाहीं, तो मान व करुणा यांस पात्र

आहे. मृत देहाचा स्पर्श झाल्यानंतर, किंवा अंगाला तेल लावल्यानंतर, किंवा हजामत केल्यानंतर किंवा करविल्यानंतर, आपण स्नान करतों तें केवळ आरोग्याच्या दृष्टीनें. मृत देहाचा स्पर्श झाल्यास, किंवा तेल लावल्यास किंवा लावून घेतल्यावर कोणी स्नान करीत नसेल तर त्याला वाटल्यास घाणेरडा म्हणा; परंतु तो पापी किंवा पातकी नव्हे. एरवीं आईला सुद्धां मुलाचें हगमूत काढल्यानंतर ती स्नान करीपर्यंत किंवा हातपाय धुवीपर्यंत अस्पृश्य मानली तर त्यांत कांहीं वावगें नाहीं; पण मूल खेळतां खेळतां तिला शिवलें तर त्याला नाहीं होणार विटाळ, कीं नाहीं त्याचा आत्मा हि मलिन व्हायचा. पण ज्यांना आपण हलकेपणाच्या अर्थानें भंगी, धेड, चांभार इत्यादि नांवांनीं संबोधितों त्यांना तर जन्मतःच अस्पृश्य लेखण्यांत येतें. मग ते शेंकडो साबण खर्च करून वर्षानुवर्षें अंग चोळून कां काढीतना, वैष्णवांसारखा पोशाख कां करीतना,

गळयांत तुळशीची माळ कां घालीतना, रोज गीता-पाठ कां करीतना, आणि धंदा कारकुनाचा कां करीतना, ते अस्पृश्य ते अस्पृश्य च. अशा तऱ्हेनें जो धर्म समजला जातो, किंवा धर्म म्हणून आचरिला जातो, तो धर्म नव्हे तर अधर्म च आहे व नाशाला लायक आहे. अस्पृश्यतानिवारणाला व्रताचें स्वरूप देण्यांत आपण असें मानतों कीं अस्पृश्यता हें हिंदुधर्माचें अंग नाहीं, एवढें च नव्हे तर ही हिंदुधर्मांत शिरलेली घाण आहे, हा भ्रम आहे, पाप आहे व तिचें निवारण करणें प्रत्येक हिंदूचा धर्म आहे, त्याचें तें परम कर्तव्य आहे. म्हणून जो तें पाप आहे असें मानतो, त्यानें त्याबद्दल प्रायश्चित्त करावें; आणि समजूतदार हिंदूंनीं कांहीं नाहीं तरी प्रायश्चित्त म्हणून, धर्मकार्य समजून, अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या प्रत्येक बंधुभगिनीशीं आपलेपणा जोडावा. त्यांना मनोभावानें, सेवाभावानें, स्पर्श करावा; त्या स्पर्शानें आपण पुनीत झालों असें मानावें.

'अस्पृश्या' च्या अडचणींचें निवारण करावें; आज अनेक वर्षें त्यांना चिरडून टाकण्यांत आल्यामुळें त्यांच्यामधें जे अज्ञानादि दोष शिरले आहेत ते काढून टाकण्यास त्यानें त्यांना सोशीकपणें मदत करावी; आणि असें च करण्याविषयीं इतर हिंदूंचीं मनें वळवावीं; त्यांना प्रोत्साहन द्यावें.

या दृष्टीनें अस्पृश्यतेकडे पाहिलें असतां, तिचें निवारण करण्यापासून जे ऐहिक किंवा राजकीय फायदे होणार ते व्रतधाऱ्याच्या दृष्टीनें क्षुल्लक होत. हे किंवा यांसारखे फायदे होवोत वा न होवोत, व्रत म्हणून अस्पृश्यता-निवारणाचें आचरण करणाऱ्यानें अस्पृश्य लेखले जाणारांना धर्मबुद्धीनें आपलेसें करावें. सत्य वगैरे व्रतांचें आचरण करतांना आपण ऐहिक परिणामांचा विचार करूं च नये. व्रतधारी इसमाच्या बाबतींत सत्याचरण हें कांहीं एक धोरण नव्हे, ती त्याच्या हाडींमाशीं खिळलेली वस्तु आहे, त्याचा स्वभाव आहे. अस्पृश्यता

निवारण सुद्धां व्रतधाऱ्याला त्या च प्रमाणें आहे.

अस्पृश्यतेचें हें महत्त्व कळून आलें म्हणजे आपल्या हें हि लक्षांत येईल कीं ही घाण केवळ ज्यांना धेड-भंगी म्हणतात त्यांच्या च बाबतींत प्रचारांत आली आहे असें नाहीं. कुजक्या भागाची ही रीत च आहे कीं प्रथम तो राईच्या दाण्याएवढा दिसतो, मग पहाडाचें स्वरूप घेतो आणि अखेरीस ज्या वस्तूंत त्यानें बिऱ्हाड केलें असेल तिचा सत्यानाश करीत जातो. अस्पृश्यतेचें हि तसें च आहे. ही शिवाशीव परधर्मीयांबाबत प्रचारांत आली आहे, अन्य संप्रदायांबाबत आली आहे, एका च संप्रदायांत आपापसांत शिरली आहे. येथपर्यंत कीं कित्येक जण शिवाशीव पाळतां पाळतां पृथ्वीवर भाररूप बनून गेले आहेत. आपलें च संभाळायचें, आपले च लाड करायचे, आंघोळी करायच्या, वस्त्रें धुवायचीं, खायचें-प्यायचें या सर्वांखालीं त्यांना फ़ुरसत कशी ती मिळत नाहीं. ईश्वराच्या नांवानें

ईश्वराला बाजूला ठेवून स्वतःची च पूजाअर्चा करूं लागले आहेत. म्हणून च अस्पृश्यतानिवारण करणारानें महारचांभारांना आपलेसें करणें एवढ्यावर च संतोष मानून बसतां कामा नये. जोंपर्यंत त्याला जीवमात्रांमधें स्वतःची ओळख पटली नाहीं, आणि स्वतःला त्यानें जीवमात्रांमधें अर्पून टाकलें नाहीं, तोंपर्यंत तो स्वस्थ बसणार नाहीं. अस्पृश्यता निवारण म्हणजे उभ्या जगाशीं मैत्री जोडणें, त्याचा सेवक बनणें. अशा तऱ्हेनें पाहिलें असतां अस्पृश्यतानिवारण हें अहिंसेचें जोडीदार बनून जातें, व खरोखरी आहे च. अहिंसा म्हणजे जीवमात्राबद्दल पूर्ण प्रेम. अस्पृश्यता-निवारणाचा तरी तो च अर्थ आहे. जीवमात्राबरोबरचा भेद पुसून टाकणें म्हणजे च अस्पृश्यतानिवारण. अशा तऱ्हेनें अस्पृश्यतेकडे पाहिलें असतां तो दोष थोड्या बहुत अंशानें सर्व जगभर व्यापून राहिलेला आहे खरा च. येथें आपण त्याचा हिंदुधर्मावरील कीट या दृष्टीनें

विचार केला आहे. कारण हिंदुधर्मामधें त्यानें धर्माचें स्थान पटकावलें आहे, आणि धर्माच्या नांवाखालीं लक्षावधि, किंबहुना कोट्यवधि लोकांची गुलामासारखी दशा करून सोडली आहे.

० ० ०

# अंगमेहनत

ता. ६-९-'३०

मंगल-प्रभात

अंगमेहनत प्रत्येक माणसाला आवश्यक आहे हा सिद्धांत प्रथम माझ्या मनांत भिनला टॉल्स्टॉयच्या एका निबंधावरून. परंतु हा सिद्धांत इतक्या स्पष्टपणें पटण्यापूर्वी च रस्किनचें ' अंटु धिस लास्ट ' ( सर्वोदय ) वाचून लगे च मी त्याचें आचरण हि करूं लागलों होतों. अंगमेहनत हें 'ब्रेड-लेबर' या अिंग्रजी शब्दाचें भाषांतर आहे. 'ब्रेड-लेबर' चें शब्दशः भाषांतर रोटी–(साठीं) मेहनत. रोटीसाठीं प्रत्येक माणसानें मेहनत केली च पाहिजे, शरीर वांकविलें पाहिजे, असा ईश्वरी नियम आहे. या सिद्धांताचा मूळ शोध टॉलस्टॉयचा नव्हे तर टॉलस्टॉयहून ब-या च अप्रसिद्ध अशा बुनोंह नांवाच्या रशियन लेखकाचा आहे. टॉलस्टॉयनें त्याला प्रसिद्धि

देऊन आपलासा केला. माझ्या नजरेला हा च सिद्धांत भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत दिसून येतो. यज्ञ केल्याखेरीज जो खातो तो चोरीचें अन्न खातो, अशा तऱ्हेचा भयंकर शाप यज्ञ न करणाराला दिलेला आहे. या ठिकाणीं यज्ञ याचा अर्थ अंगमेहनत किंवा रोटी-मेहनत हा च योग्य दिसतो. माझ्या मतें तर हा च एक अर्थ शक्य आहे. तें कसें हि असो हा च आपल्या या व्रताचा उगम होय. बुद्धिवादानें हि आपण या सिद्धांताशी येऊन पोंचतों. मेहनत करीत नाहीं त्याला खाण्याचा हक्क च काय ? बायबल सांगतें; 'तूं आपली भाकर स्वतःच्या अंगांतून घाम काढून कमव व खा, कोट्यधीश सुद्धां जर आपल्या पलंगावर लोळत च राहिला, आणि तोंडांत कोणी आणून घालील तेव्हां च खात गेला, तर त्याला फार काळ खातां यायचें नाहीं, त्याला अन्नाची गोडी हि वाटणार नाहीं. म्हणून तो व्यायाम वगैरे करून भूक लागेशी करतो; आणि खाण्यासाठीं तर त्याला

स्वतःचें च हात-तोंड हलवावें लागतें. जर अशा तऱ्हेनें या नाहीं तर त्या रूपानें शारीरिक व्यायाम राव व रंक सर्वांना करावा च लागतो, तर मग रोटी उत्पन्न करण्याचा च व्यायाम सर्वांनीं कां करूं नये, असा प्रश्न सहजीं च उद्भवतो. शेतकऱ्याला नाहीं कोणी हवा खायला कीं व्यायाम करायला सांगत. आणि दुनियेंतील नव्वद टक्क्यांहून अधिक लोकांचा निर्वाह शेतीवर च चालला आहे. त्यांचें अनुकरण बाकीच्या दहा टक्क्यांनीं केलें तर जगांत किती सुख, किती शांति ,व किती आरोग्य फैलावेल बरें! शिवाय शेतीबरोबर बुद्धि मिसळल्यानें शेतीच्या कामांतील पुष्कळसे क्लेश आपोआप दूर होतील. तसें च, अंगमेहनतीचा हा निरपवाद कायदा जर सर्वांनीं मान्य केला तर उच्च व नीच हा भेद च उरणार नाहीं. सध्यां जेथें उच्चनीचतेचा गंध हि नसावयाचा अशा ठिकाणीं हि, म्हणजे वर्णव्यवस्थेमधें, हा भेद शिरला आहे. सर्व जगभर मालक

व मजूर असे भेद पडून राहिले आहेत, आणि गरीब लोक श्रीमंतांचा हेवा करीत आहेत. सर्वांनीं च जर आपापल्या पोटापुरतें काम केलें तर उच्चनीच भेद च निघून जाईल; इतक्या उपर हि धनिक वर्ग राहील त्यानें आपल्याला आपल्या मिळकतीचा मालक न समजतां केवळ रखवालदार किंवा पंच मानावें, व तिचा उपयोग मुख्यतः केवळ लोकसेवेसाठीं करावा. ज्याला अहिंसेचें पालन करावयाचें आहे, सत्याची आराधना करावयाची आहे, ब्रह्मचर्याला आपला जन्मस्वभाव बनवावयाचें आहे, त्याला तर अंगमेहनत ही रामबाणाप्रमाणें होते.

ही मेहनत खरें पाहूं गेलें असतां शेतीची च होय.पण सध्यां तरी अशी स्थिति आहे कीं ती करणें सर्वांना च साधणार नाहीं. म्हणून शेतीचा आदर्श नजरेपुढें ठेवून शेतीच्या ऐवजीं माणसानें इतर कसली तरी मेहनत केल्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ : कांतणें, विणणें, सुतारकाम, लोहारकाम

इत्यादि, इत्यादि. प्रत्येकानें आपापला भंगी तर झाले च पाहिजे. जो अन्न खातो त्याला मलत्याग करावा च लागणार. मलत्याग करणारानें च आपला मळ पुरून टाकावा ही उत्तम रीत होय. तेवढें जमत नसेल तर प्रत्येक कुटुंबानें आपलें काम करावें. जेथें भंगीकाम हा स्वतंत्र धंदा कल्पिला गेला आहे तेथें कसला तरी महादोष शिरलेला असला पाहिजे असें मला आज कित्येक वर्षांपासून वाटत आहे. या आवश्यक, आरोग्यदायक, कामाला सगळ्यांत हलकें प्रथम कोणीं गणलें असेल याचा इतिहास आपल्यापाशीं नाहीं. ज्यानें गणलें त्यानें आपल्यावर उपकार मात्र केलेला नाहीं. आपण सर्व भंगी आहों ही भावना आपल्या मनांत बालपणा-पासून च ठसली पाहिजे, आणि ती तशी ठस-विण्याचा उत्तमांत उत्तम मार्ग हा आहे कीं ज्यांची समजूत पटली आहे अशांनीं अंगमेहनत सुरू करावयाची ती पायखाने साफ करण्यापासून च करावी.

असें जो ज्ञानपूर्वक करील तो त्या च क्षणापासून धर्माला निराळ्या च व खऱ्या तऱ्हेनें ओळखावयाला शिकेल. मुलें, म्हातारेकोतारे व व्याधिग्रस्त लोक यांनीं मेहनत केली नाहीं तर तो नियमाला अपवाद समजावयाचा नाहीं. मुलाचा समावेश त्याच्या आईच्या कामांत होतो. निसर्गाच्या नियमांचा भंग न होईल तर म्हातारे हि पंगु बनणार नाहींत, आणि रोग जवळपास फिरकेल तरी कशाला ?

० ० ०

## सर्वधर्मसमभाव — १

ता. २३-९-'३०

मंगळप्रभात

आपल्या व्रतांमध्यें ज्या व्रताला आपण सहिष्णुता या नांवानें ओळखतों त्याला च मीं हें नवीन नांव दिलें आहे. सहिष्णुता हें 'टॉलरेशन्' या अिंग्रजी शब्दाचें भाषांतर आहे. पूर्वीं हि मला हें नांव आवडलें नव्हतें च, पण त्याअैवजीं दुसरा कोणता शब्द सुचत नव्हता. काकासाहेबांना हि हें नांव आवडत नव्हतें. त्यांनीं 'सर्वधर्म--आदर' नांव सुचविलें. मला ते हि रुचलें नाहीं. इतर धर्मांना 'सहन करण्यामध्यें' त्यांचा कमीपणा गृहीत धरल्या प्रमाणें होतें. 'आदरा' मध्यें हि मेहेरबानीचा भाव येतो. अहिंसा आपल्याला इतर धर्मांबद्दल समभाव शिकविते. आदर आणि सहिष्णुता हीं अहिंसेच्या दृष्टीनें पुरेशीं नाहींत. इतर धर्मांविषयीं समभाव

राखण्याच्या मुळाशीं स्वतःच्या धर्माच्या अपूर्णतेची कबुली येऊन च जाते. सत्याची आराधना सुद्धां, अहिंसेची कसोटी सुद्धां, आपल्याला हें च शिकविते. संपूर्ण सत्य जर आपल्या हातीं लागलेलें असेल तर मग सत्याच्या आग्रहाचें प्रयोजन च काय? मग तर आपण प्रत्यक्ष परमेश्वर च होऊं. कारण कीं सत्य म्हणजे च परमेश्वर अशी आपली समजूत आहे. आपल्याला पूर्ण सत्य कळत नाहीं. म्हणून तर आपण त्याबद्दल आग्रह बाळगतों, त्यामुळें च तर पुरुषार्थ शक्य होतो. यांत आपल्या अपूर्णतेची कबुली आली. जर आपण स्वतः अपूर्ण, तर आपण कल्पिलेला धर्म हि अपूर्ण. स्वतंत्र, म्हणजे मनुष्यबुद्धिनिरपेक्ष, धर्म संपूर्ण आहे. पण तो आपण पाहिलेला नाहीं, ज्याप्रमाणें ईश्वरालाहि आपण पाहिलेला नाहीं. आपण मानतों तो धर्म अपूर्ण आहे, त्यामध्यें नित्य फेरफार होत असतात, आणि व्हायचेच. असें झालें तर च आपण उत्तरोत्तर

चढूं शकूं; सत्याकडे, ईश्वराकडे, रोजच्या रोज जवळ जात जाऊं.

आणि मनुष्यकल्पित सर्व धर्म अपूर्ण आहेत असें एकदां कबूल केलें कीं मग कोणत्याहि धर्माला उच्च किंवा नीच लेखण्याचा प्रश्न च उरत नाहीं. सर्व च धर्म खरे आहेत पण सगळे च अपूर्ण हि आहेत, अर्थात् दोषाला पात्र आहेत. समभाव वाटत असतांहि आपण त्यांच्यांतील दोष पाहूं शकूं, स्वतःच्यांतीलहि पाहूं शकूं, हे दोष त्याच्यामध्यें आहेत एवढ्यासाठीं त्याचा त्याग करणार नाहीं तर दोष तेवढे टाळूं. अशा तऱ्हेनें समभाव राखला म्हणजे इतर धर्मांमध्यें जें कांही ग्राह्य दिसेल त्याला स्वतःच्या धर्मामध्यें स्थान देण्यास आपण अनमान करणार नाहीं. एवढें च नव्हे तर तसें करणें आपलें कर्तव्य ठरेल.

सर्व धर्म ईश्वरदत्त च आहेत, परंतु ते मनुष्यकल्पीत असल्यामुळें, मनुष्य हा त्यांचा प्रचार करीत

असल्यामुळें, ते अपूर्ण आहेत. ईश्वरदत्त धर्म अगम्य आहे. त्याला भाषेमध्यें व्यक्त करणारा मनुष्य आहे, त्याचा अर्थ लावणाराहि मनुष्य च. कोणाचा अर्थ खरा समजावयाचा ? सर्वच आपापल्या दृष्टीनुरूप—ती दृष्टि कायम आहे तोंपर्यंत—खरे. पण सगळेच खोटे असतील हेंहि अशक्य नाहीं. म्हणूनच आपण सर्व धर्मांबद्दल समभाव बाळगावा. यामध्यें स्वतःच्या धर्माबद्दल उदासीनता नाहीं येत, तर स्वतःच्या धर्माविषयींचें आपलें प्रेम आंधळें होतें त्याऐवजीं ज्ञानमय बनतें.व त्यामुळें अधिक सात्त्विक, निर्मळहि बनतें. सर्व धर्मांविषयीं समभाव बाणेल तेव्हांच आपले दिव्यचक्षु उघडतील. धर्मांधता व दैवी साक्षात्कार यांमध्यें उत्तर-दक्षिण दिशांइतकें अंतर आहे. धर्मज्ञान होतांच आडपडदे उडून जातात व समभाव उत्पन्न होतो. आपण जसजसा या समभावाचा अभ्यास करूं तसतशी आपल्याला आपल्या स्वतःच्या धर्मांची हि अधिक चांगली ओळख

होत जाईल.

येथें धर्म व अधर्म यांमधील भेद मात्र टळत नाहीं. येथें गोष्ट चालली आहे ती जे ठाम झालेले धर्म म्हणून आपल्याला माहीत आहेत त्यांचीच होय. या सर्व धर्मांमध्यें मूळ सिद्धांत एकच आहेत. त्या सर्व धर्मांमध्यें संत स्त्रीपुरुष होऊन गेले आहेत आज हि हयात आहेत. म्हणून धर्मांबद्दलचा समभाव व धर्मीयांबद्दलचा – मनुष्यांबद्दलचा – समभाव यांमध्यें कांहींसा फरक आहे. मनुष्यमात्राबद्दल –दुष्टाबद्दल आणि श्रेष्ठाबद्दल, धर्मनिष्ठाबद्दल आणि धर्महीनाबद्दल – समभाव असावा असें आमचें म्हणणें; अधर्माबद्दल मात्र कालत्रयीं नाहीं.

मग असा प्रश्न उपस्थित होतो कीं अनेक धर्म मुळीं पाहिजेतच कशाला? धर्म अनेक आहेत हें तर आपल्याला दिसतेंच आहे. आत्मा एक आहे, पण मनुष्यदेह असंख्य आहेत. देहांची असंख्यता टाळावयाची म्हटल्यास टाळतां येणार नाहीं. तरी हि

आत्म्यांची एकता आपण ओळखूं शकतों. त्याच न्यायानें धर्माचें मूळ एक आहे, जसें वृक्षाचें असतें; पण त्याला असंख्य पानें आहेत.

० ० ०

## सर्वधर्मसमभाव—२

ता. ३०-९-'३०

मंगळप्रभात

हा विषय इतका महत्त्वाचा आहे कीं त्याचा येथें आणखी थोडा विस्तार करतों. मीं स्वतःचाच थोडासा अनुभव सांगितला तर समभावाचा अर्थ कदाचित् अधिक स्पष्ट होईल. येथल्याप्रमाणेंच फिनिक्समध्येंहि[1] रोज प्रार्थना होत असे. तिच्यामध्यें हिंदु, मुसलमान, खिस्ती सर्व असत. सद्गत[2] रुस्तमजी शेट किंवा त्यांचे चिरंजीव पुष्कळदां हजर रहायचे. रुस्तमजी शेटना 'मने वहालुं दादा रामजीनुं नाम' हें भजन फार आवडे. मला आठवत आहे त्याप्रमाणें, एकदां मगनलाल कीं

---

१ दक्षिण आफ्रिकेंत जोहानिसबर्गजवळील एक खेडें. येथें गांधीजींनी आश्रम काढला होता. —अनुवादक.

२ कैलासवासी—अनुवादक.

काशी[1] भजन सांगत होती व आम्ही सर्वजण म्हणत होतों. रुस्तमजी शेट उल्हासाच्या भरांत एकदम म्हणतात : “ दादा रामजीं ऐवजीं ‘ दादा होरमझ्द ’ म्हणाना ” सांगणारानें तसेंच म्हणणारांनीं, ही कल्पना अगदीं स्वाभाविक अशा तऱ्हेनें चटकन उचलली. आणि पुढें रुस्तमजी शेट असतील तेव्हां बिलकुल न चुकतां, आणि कधीं कधीं तर ते नसतांनाहि आम्हीं तें भजन ‘ दादा होरमझ्द ’ च्या नांवानें गात असूं. सद्गत दाऊद शेटजींचा मुलगा सद्गत हुसेन तर आश्रमांत पुष्कळदां रहायला असे. तो प्रार्थनेमध्यें हौसेनें भाग घेत असे. तो स्वतः फार मधुर स्वरानें ‘ऑर्गन’ बरोबर ‘ये बहारे बाग दुनिया चंदरोज’ म्हणत असे; आणि तें

---

१ मगनलाल गांधींचे बंधु छगनलाल यांची पत्नी. —अनुवादक.

आश्रमभजनावलि पहा. अर्थ–दुनियारूपी बगीच्याचा हा बहर दोन दिवसांचा आहे—अनुवादक.

अनुक्रम

भजन त्यानें आम्हांलाहि सर्वांना शिकविलें होतें व प्रार्थनेंत पुष्कळदां म्हटलें जात असे. आपल्या-येथील भजनावलीध्यें या भजनाला जें स्थान दिलेलें आहे, तें सत्यप्रिय हुसेनचें स्मारकच होय. त्याच्याहून अधिक एकनिष्ठपणें सत्याचें आचरण करणारे तरुण माझ्या पाहण्यांत नाहींत. जोसेफ रॅयपेन् पुष्कळदां आश्रमांत येऊन जात. ते पडले ख्रिस्ती. त्यांना 'वैष्णव जन तो' फार आवडे. त्यांना संगीताचें चांगलें ज्ञान होतें. त्यांनीं 'वैष्णव जन' च्या जागीं 'ख्रिश्चन जन तो तेने कहीये' असें गाइलें; सर्वांनीं लगेंच उचललें. जोसेफ्ना अमर्याद हर्ष झालेला मला दिसून आला.

स्वतःच्या मनाच्या समाधानासाठीं मी एकवेळ निरनिराळे धर्मग्रंथ चाळीत राहिलों होतों; त्यावेळीं ख्रिस्तीधर्म, इस्लाम, [1]जरथुस्ती, यहुदी आणि हिंदु एवढ्या धर्मांच्या ग्रंथांचा स्वतःच्या समाधानापुरता

१ पारशांचा धर्म. धर्मगुरु जरथुस्त—अनुवादक.

परिचय करून घेतला होता. तसें करतेवेळीं माझ्या मनांत सर्व धर्मांबद्दल समभाव असे, असें मी सांगू शकतों. त्यावेळीं माझ्यामध्यें त्याची जाणीव होती असें मी सांगूं शकत नाहीं. समभाव शब्दाचाहि नीटसा अर्थ त्यावेळीं कळत नसावा. पण त्यावेळचीं स्मरणें ताजीं करूं जातां मला त्या त्या धर्माची टीका करण्याची जरा पण इच्छा झाल्याचें आठवत नाहीं. त्या त्या धर्मांच्या पुस्तकांचें मी धर्मग्रंथ या दृष्टीनें आदरपूर्वक वाचन करीत असें व सर्व धर्मांमध्यें मूळ नैतिक सिद्धान्त एकच असल्याचें मला आढळत असें. कित्येक बाबींचा मला उलगडा होत नसे. हिंदुधर्मग्रंथांच्या बाबतींतहि तसें होई. आज सुद्धां कांहीं गोष्टी मला समजत नाहींत. पण अनुभवानें मला वाटूं लागलें आहे कीं आपण समजूं शकत नाहीं तें सर्व झूट च आहे असें मानण्याची उतावीळ करणें चूक आहे. कांहीं गोष्टी ज्या पूर्वीं समजत नसत त्याच आज दिव्याप्रमाणें स्पष्ट दिसतात.

समभावाचा अभ्यास केल्यानें कित्येक कोडीं आपल्या आपण उलगडून जातात. आणि कांहीं ठिकाणीं आपल्याला स्पष्ट दोषच दिसले तरी ते दाखवून देतांना आपल्यामध्यें जी नम्रता व जो विनय असतो त्यामुळें ते दाखवून दिल्यानें कोणाला दुःखहि होत नाहीं.

एक अडचण मात्र कदाचित् शिल्लक राहते. गेल्या खेपेला मीं सांगितलें कीं धर्म व अधर्म यांतील भेद राहणारच, आणि अधर्माबद्दल समभाव अभ्यासिण्याचा या ठिकाणीं हेतु नाहीं. असें असेल तर मग धर्माधर्मांचा निर्णय करतांनाच समभावाची सांखळी तुटून पडत नाहीं कां? असा प्रश्न उद्भवेल. आणि अशा तऱ्हेनें धर्माधर्मांचा निर्णय करणाराची चूक होईल असाहि संभव खराच. पण आपल्यामध्यें खरी अहिंसा वसत असेल तर आपण वैरभावांतून बचावून जात असतों. कारण कीं आपल्याला अधर्म दिसला असला तरी तो अधर्म

आचरणाऱ्याविषयीं आपल्या मनांत प्रेमभावच असणार. आणि म्हणून एक तर तो आपली दृष्टि मान्य करील, नाहींपेक्षां आम्हांलाच आमची चूक दाखवून देईल. किंवा असेंहि होईल कीं दोघेहि एकमेकांचा मतभेद सहन करीत राहतील. फार तर, दुसरा पक्ष अहिंसक नसल्यास तो कठोरता दाखवील तरी सुद्धां आपण जर अहिंसेचे खरे पुजारी असूं, तर आपली मृदुता त्याच्या कठोरतेचें निवारण करणारच याबद्दल शंका नाहीं. दुसऱ्याच्या चुकीबद्दलहि आपल्याला त्याला पीडा द्यावयाची नाहीं स्वतः पीडा सहन करावयाची आहे. हा सुवर्णनियम जो पाळतो तो सर्व संकटांमधून तरून जातो.

## नम्रता

ता. ७-१०-'३०

मंगल-प्रभात

याचा आपल्या व्रतांमध्यें स्वतंत्र निर्देश केलेला नाहीं, करणें उचित हि नाहीं. अहिंसेचाच हा एक अर्थ आहे, किंवा असेंहि म्हणा, कीं त्याच्यामध्यें हें येऊन गेलें. पण नम्रता अभ्याससाध्य नाहीं. ती स्वभावतःच प्राप्त झाली पाहिजे. आश्रमाची नियमावलि प्रथम तयार केली त्यावेळीं तिचा मसुदा मित्रमंडळीकडे पाठविला होता. सर गुरुदास बानर्जींनीं नम्रतेला व्रतांमध्यें स्थान देण्यांत यावें अशी सूचना केली, आणि त्यावेळींहि तिचा निर्देश न करण्याला मीं तेंच कारण दिलें होतें, जें आतां येथें लिहीत आहें. परंतु जरी तिला व्रतांमध्यें स्थान नसलें तरीहि नम्रता ही व्रतांपेक्षांहि कदाचित् अधिक अवश्यक आहे; पण अभ्यासानें कोणाच्या अंगीं नम्रता

आल्याचें आपल्या माहितींत नाहीं. सत्य घटवितां येईल, दया घटवितां येईल, परंतु नम्रता घटविणें म्हणजे दंभ घटविणेंच होय असें म्हणतां येईल. थोरामोठ्यांमध्यें एकमेकांच्या सन्मानाची रीत म्हणून जी शिकविली जाते किंवा तोंडीं लागते ती ही नम्रता नव्हे. एक जण दुसऱ्याला साष्टांग नमस्कार घालीत असेल. पण मनांत तर त्याच्याविषयीं तिरस्कार भरला असेल ! ही नम्रता नव्हे, लुच्चेगिरी आहे. कोणी रामनामाचा जप करीत असेल, माळा फिरवीत असेल, लोकांसमक्ष महामुनि होऊन बसत असेल; पण आंत स्वार्थ भरलेला असेल तर तो नम्र नसून पाखंडी होय. नम्र माणसाला आपण नम्रपणें केव्हां वागलों याची खबरच नसते. सत्य इत्यादींचें आपण आपल्यापाशीं मोजमाप ठेवूं शकतों, नम्रतेला मोजमापच नाहीं. स्वभावसिद्ध नम्रता लपून राहील असें नव्हे. पण नम्र माणसाला स्वतःला ती दिसत नसते. वसिष्ठ-

विश्वामित्राचें उदारण तर आपण आश्रमामध्यें अनेकदां समजून घेतलें आहे. आपली नम्रता शून्यत्वा-पर्यंत जाऊन पोंचली पाहिजे. आपण कोणी तरी आहों हें भूत मनांत भरलें कीं नम्रभाव तेथून उडून गेला आणि आपलीं सर्व व्रतें धुळीस मिळालीं. व्रतपालनाबद्दल जो गर्व मानील, तो आपल्या साऱ्या व्रतांची किंमत घालवून बसेल व समाजामध्यें विषरूप बनून राहील. लोकांनाहि त्याच्या व्रतांची किंमत वाटणार नाहीं, आणि स्वतः त्यालाहि त्यांचें फळ उपभोगतां येणार नाहीं. नम्रता म्हणजे मीपणाचा आत्यंतिक क्षय. विचार केल्यास लक्षांत येण्याजोगें आहे कीं या विश्वामध्यें कोणताहि जीव एका रजःकणाहूनहि क्षुल्लक आहे. देहाच्या दृष्टीनें पाहिलें असतां आपण क्षणभंगुर आहों. कालाच्या अनंत चक्रामध्यें आपल्या आयुष्याच्या शंभर वर्षांचा पत्ताहि लागणार नाहीं. परंतु जर का आपण या भोंवऱ्या

मधून निसटलों, म्हणजे कोणी नव्हेसे होऊन गेलों, तर मग सर्व कांहीं आपणच आहों. आपण कांहीं तरी, कोणी तरी, असणें म्हणजे ईश्वरापासून, परमात्म्यापासून, सत्यापासून वेगळें पडणें. 'कांहीं' नाहींसें होणें म्हणजेच परमात्म्यांत मिळून जाणें. समुद्रांत असलेला छोटा बिंदुहि समुद्राच्या थोरवीचा धनी असतो, पण त्याला त्याची जाणीव नसते. समुद्रापासून वेगळा होऊन तो मीपणाचा टेंभा मिरवूं लागला कीं त्याक्षणींच तो सुकून गेला. आपल्या या जीवनाला पाण्याच्या बुडबुड्याची उपमा देण्यांत आली आहे. त्यांत मला बिलकुल अतिशयोक्ति वाटत नाहीं. असली नम्रता किंवा शून्यता ओढून ताणून थोडीच येणार? पण व्रतांचें यथायोग्य आकलन केल्यानें नम्रता आपोआप अंगीं बाणत जाते. सत्याचें पालन करूं इच्छिणाराला अहंकारी होऊन कसें चालेल? इतरांसाठीं प्राण सांडूं इच्छिणारा स्वतःसाठीं जागा अडवीत कोठून बसणार? त्यानें स्वतःचे प्राण

अर्पिण्याचा निश्चय केला त्याच वेळीं स्वतःचा देह फेकून दिला.

ही नम्रता म्हणजे पुरुषार्थहीनता तर नव्हे च. हिंदुधर्मामध्यें असा अर्थ करून टाकण्यांत आला आहे खरा. आणि त्यामुळें आळसाचें, पाखंडाचें पुष्कळ ठिकाणीं बरें फावलें आहे. खरें पाहिलें असतां नम्रता म्हणजे तीव्रतम पुरुषार्थ. मात्र तो सर्व परमार्थासाठीं असणार. खुद्द ईश्वर दम न टाकतां चोवीसहि तास काम करीत असतो, अंगाला आळेपिळे देण्यापुरतीहि सवड घेत नाहीं. आपण त्याचे झालों त्याच्यामध्यें मिसळून गेलों, कीं मग आपला उद्यम सुद्धां त्याच्याप्रमाणेंच अतंद्रित झाला, झाला पाहिजे. समुद्रापासून वेगळया पडलेल्या बिंदूच्या बाबतींत आपण विश्रांतीची कल्पना करू शकतों. पण समुद्रांत असणाऱ्या बींदूला विश्रांति कोठली? समुद्राला एका क्षणाची तरी विश्रांति आहे कुठें? आपलेंहि तंतोतंत तसेंच आहे. ईश्वररूपी सागरांत आपण

मिळून गेलों कीं आपली विश्रांति गेली, विश्रांतीची अवश्यकताहि उरली नाहीं. हीच खरी विश्रांति; हीच खरी महान् अस्वस्थतेंतील स्वस्थता. म्हणून खरी नम्रता ही आपल्याकडून जीवमात्राच्या सेवे-प्रीत्यर्थ सर्वार्पणाची अपेक्षा करते. सर्व आटपून बसल्यानंतर आपल्यापाशीं नाहीं उरत रविवार, कीं शुक्रवार कीं सोमवार. या स्थितीचें वर्णन करणें कठिण आहे, पण ती अनुभवगम्य आहे. ज्यानें सर्वार्पण केलें आहे त्याला ती अनुभवावयास मिळालेली असते. आपणां सर्वांनाहि अनुभवितां येण्याजोगी आहे. ती अनुभविण्याच्या हेतूनें तर आपण आश्रमांत एकत्र जमलों आहों. सारीं व्रतें, सारीं कामें, तिचा अनुभव प्राप्त करण्यासाठीं आहेत. दुसरें तिसरेंच कांहीं करीत असतां कधीं काळीं ती आपल्या हातीं लागून जाईल. तिच्याच मागें लागून ती मिळणारी नाहीं.

# स्वदेशी

या प्रवचनांमध्यें 'स्वदेशी' वर लिहिण्याचें गाळूनच टाकतों. राजकीय बाबींना धका न लावण्याचा संकल्प आहे. त्याला थोडा तरी बाध येण्याचा संभव वाटतो. स्वदेशीविषयीं निवळ धार्मिक दृष्टीनें लीहावयाचें म्हटलें तरी असें थोडें तरी लिहावें लागणार कीं ज्याचा अप्रत्यक्ष रीतीनें तरी राजकारणाशीं संबंध पोंचेल.

# स्वदेशी-व्रत

( नवजीवनवरून )

स्वदेशी-व्रत हें या युगांतील महाव्रत होय. जी गोष्ट आत्म्याचा धर्म आहे, परंतु अज्ञानामुळें किंवा अन्य कारणांनीं आत्म्याला जिची जाणीव उरलेली नाहीं, तिच्या पालनासाठीं व्रत घेण्याची जरूर पडते. जो जन्मत: च निर्मांसाहारी आहे, त्याला मांसाहार न करण्याचें व्रत घेण्याचा प्रश्न च येत नाहीं. मांसाबद्दल त्याला लालसा तर वाटत नाहीं च उलट मांस दृष्टीस पडतां च त्याला ओकारी येणार.

स्वदेशी हा आत्म्याचा धर्म आहे, पण त्याचा विसर पडला आहे. म्हणून त्याच्यासंबंधीं व्रत घेण्याची आवश्यकता उत्पन्न होते. आत्म्याच्या दृष्टीनें स्वदेशीचा अंतिम अर्थ सर्व तऱ्हेच्या बाह्य संबंधां-पासून संपूर्ण मुक्ति हा च होय. देह सुद्धां आत्म्याला

परदेशी आहे. कारण कीं इतर आत्म्यांशीं ऐक्य साधण्याच्या आड देह येतो, देह हा आत्म्याच्या मार्गामध्यें विघ्नरूप आहे. स्वदेशीधर्म जाणणारा व पाळणारा इसम जीवमात्राबरोबर ऐक्य साधण्यासाठीं देहाचा हि त्याग करील.

हा अर्थ खरा असेल तर आपल्या जवळपास असलेल्या लोकांच्या सेवेमध्यें मग्न होऊन राहणें यांत च स्वदेशीधर्म आहे हें कळण्यास आपल्याला अडचण पडणार नाहीं. अशी सेवा केल्यानें दूरचे राहून जातात, किंवा त्यांना नुकसान पोचतें, असा भास होण्याचा संभव आहे, पण तो केवळ भास च. स्वदेशीची शुद्ध सेवा केल्यानें परदेशीची सुद्धां शुद्ध सेवा घडते च. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं.

याच्या उलट दूरची सेवा करण्याचा मोह धरल्यास ती तर घडत नाहीं च, आणि जवळच्यांची सेवा हि राहून जाते. अशा तऱ्हेनें बावाचें हें हि जातें आणि तें हि जातें. माझ्या आधारावर असणाऱ्या

कुटुंबियांना अथवा गांववाल्यांना मीं टाकलें कीं त्यांची माझ्यावर जी भिस्त होती ती फसली. दुसऱ्याची सेवा करायला मी सरसावलों तर त्यांची सेवा करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांना त्यांचा विसर पडतो; दूरच्या लोकांचे माझ्याकडून खोटे लाड होण्याचाहि संभव; तसें झालें कीं तेथील वातावरण बिघडविण्यास मी कारण होणार, आणि स्वतःचा चुथडा तर अगोदर च होऊन चुकलेला आहे. अशा तऱ्हेनें सर्व दृष्टींनीं मी नुकसानाला च कारणीभूत होणार. अशा च तऱ्हेचे असंख्य हिशेब कल्पितां येतील व स्वदेशीधर्माची युक्तता सिद्ध करतां येईल. त्यावरून च 'स्वधर्में निधनं श्रेयः परधर्मो भयावहः'* हें वचन निघालें आहे. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणें करण्यास बिलकुल हरकत नाहीं: 'स्वदेशीचें पालन करतांना मृत्यु आला तरी तो बरा पण परदेशी भयानक च आहे.' स्वधर्म

* गीता:– अध्याय ३, श्लोक ३५ –अनुवादक.

म्हणजे स्वदेशी.

घोटाळा होतो तो स्वदेशीचा अर्थ न समजल्या-मुळें च. कुटुंबियांविषयीं मोह ठेवून मी त्यांचे लाड करावे, त्यांच्यासाठी धन चोरावें, इतर खोटें-नाटें करावें, ही स्वदेशी नव्हे. मीं फक्त त्यांच्या बाबतींतला आपला धर्म पाळावयाचा आहे. तो धर्म शोधीत व पाळीत असतां मला सर्वव्यापी धर्म सांपडून जातो. स्वधर्माच्या पालनानें परधर्मियांना किंवा परधर्माला हानि पोचत च नाहीं, पोचतां कामा च नये. इतरांची हानि होत असेल तर आपण कल्पिलेला धर्म स्वधर्म नव्हे, तो स्वाभिमान आहे, अर्थात् त्याज्य आहे.

स्वदेशीचें पालन करतांना कुटुंबाची होळी हि करावी लागेल. पण तसें करावें लागलें तरी त्या-मध्यें हि कुटुंबाची सेवा च असली पहिजे. ज्याप्रमाणें स्वतःच्या स्वार्थावर पाणी सोडल्यानें आपण स्वतःचें संरक्षण करीत असतों, त्याचप्रमाणें कुटुंबावर

पाणी सोडल्यानें कुटुंबाचें रक्षण च करूं असें हि होण्याचा संभव आहे. समजा कीं माझ्या गांवांत पटकीची सांथ पसरली आहे. या सांथीच्या तडाक्यांत सांपडलेल्या लोकांच्या शुश्रूषेला मी स्वतः लागलों व पत्नी, मुलगे, मुली यांना हि लावलें; आणि समजा कीं आम्ही सर्वजण त्या साथींत सांपडून मृत्युवश झालों. यांत मीं कुटुंबाचा संहार केला नसून त्याची सेवा च बजावली आहे. स्वदेशीमध्यें स्वार्थ नाहीं, किंवा असला च तर तो शुद्ध स्वार्थ आहे. शुद्ध स्वार्थ म्हणजे परमार्थ; शुद्ध स्वदेशी म्हणजे परमार्थाची पराकाष्ठा.

मी या विचारपद्धतीचा आश्रय घेऊन चाललों असतां खादीमध्यें मला सामाजिक शुद्ध स्वदेशीधर्म दिसून आला. सर्वांना कळेल असा, ज्याचें पालन या युगांत, या देशांत, सर्वांना च अत्यंत आवश्यक आहे, असा कोणता स्वदेशीधर्म असू शकेल? ज्याच्या अल्प आचरणानें हि हिंदुस्थानच्या

कोट्यवधि लोकांचें रक्षण होऊं शकेल असा स्वदेशी धर्म कोणता? या प्रश्नाचें उत्तर शोधत असतां खादी वचरखा हातीं लागली.

या धर्माच्या पालनानें परदेशी गिरणीवाल्याचें नुकसान होतें असें कोणीं समजूं नये. चोराला त्यानें चोरलेलें सामान परत द्यावें लागलें किंवा त्याच्या चोरीमध्यें अडथळा आणला तर त्यांत त्याचें नुकसान नाहीं, हितच आहे. शेजारचा इसम दारू पिण्याचा किंवा अफू खाण्याचा बंद झाला तर त्यामध्यें गुत्तेदाराचें किंवा अफूच्या दुकानदाराचें नुकसान नाहीं, हित च आहे. अयोग्य मार्गांनीं जे कोणी अर्थ संपादीत असतील त्यांच्या त्या अनर्थाचा नाश झाल्यास त्यांत त्यांचें व जगाचें हित च आहे.

परंतु चरख्यावर कसेंबसें सूत काढलें, खादी वापरली व इतरांना हि वापरायला लावली, कीं झालें स्वदेशीधर्माचें पूर्ण पालन, असें मानून जे

बसून राहतात ते महामोहामध्यें बुडालेले आहेत असें समजावें. खादी ही सामाजिक स्वदेशीची पहिली पायरी आहे, ती स्वदेशीधर्माची परिसीमा नव्हे. असेहि खादीधारी पाहिले आहेत कीं जे बाकीच्या सर्व जिनसा परदेशी आणून भरीत असतात. त्यांचेकडून स्वदेशीचें पालन घडत नाहीं. ते चालू प्रवाहांत वहावत चालले आहेत इतकें च. स्वदेशीव्रताचें पालन करणारा इसम नित्य आपल्या सभोंवार नजर फिरवीत राहील, आणि जेथें जेथें शेजाऱ्यांची सेवा करण्याची संधि दिसेल, म्हणजे स्वतःला आवश्यक असलेला माल त्यांच्या हातून तयार झालेला मिळण्यासारखा असेल, तेथें इतर टाकून तो तसला च माल घेईल. मग स्वदेशी वस्तु प्रथम महाग व गुणानें उतरती असली तरी चिंता नाहीं. त्यांच्यांत सुधारणा करण्याचा किंवा करवून घेण्याचा प्रयत्न व्रतधाऱ्यानें करावा. त्रासून 'स्वदेशी खराब' म्हणून परदेशी वापरूं लागूं नये.

पण ज्याला स्वदेशीधर्म कळतो तो स्वतःच्या विहिरींत बुडूनहि मरणार नाहीं. जी वस्तु स्वदेशीं बनत नाहीं, किंवा महाकष्टानें च बनवितां येते, ती कोणी परदेशाच्या द्वेषाखातर स्वतःच्या देशांत बनविण्याच्या मागें लागला तर तो स्वदेशीधर्म नव्हे. स्वदेशीधर्माचें आचरण करणारा परदेशीचा द्वेष कधीं करणार च नाहीं. म्हणजे च पूर्ण स्वदेशीमध्यें कोणाचा द्वेष नसतो. हा संकुचित धर्म नव्हे. हा प्रेमांतून, अहिंसेंतून उत्पन्न झालेला सुंदर धर्म आहे.

० ० ०

# व्रताची आवश्यकता

ता. १४-१०-'३०

मंगल-प्रभात

व्रतांच्या महत्त्वाविषयीं या लेखमालेमध्यें मीं मधून मधून थोडें बहुत लिहिलें असेल. पण जीवनाच्या बांधणीला व्रतांची किती आवश्यकता आहे याचा स्वतंत्र विचार करणें योग्य दिसतें. व्रताविषयीं लिहून झालें आहे, तरी आतां त्या व्रतांच्या आवश्यकतेसंबंधीं विचार करूं.

असा एक पक्ष आहे, आणि तो प्रबळ हि आहे, कीं जो म्हणतोः " अमुक नियमांचें पालन करणें उचित आहे हें म्हणणें ठीक, पण त्याबद्दल व्रत घेण्याची आवश्यकता नाहीं; एवढें च नव्हे तर त्यामध्यें मनाची दुर्बलता च दिसून येते, व तसें करणें हानिकारक हि होण्याचा संभव आहे. शिवाय एकदां व्रत घेतल्यानंतर तो नियम जाचक होण्याचा हि

संभव असतो; किंवा तो पापरूप हि वाटूं लागेल. व असें असतां हि त्याला चिकटून राहणें हें तर असह्य होय." ह्या पक्षाचे लोक म्हणतात "उदाहरणार्थ, दारू न पिणें ठीक आहे, म्हणून प्याली नाहीं म्हणजे झालें. पण प्रसंगीं प्याली च तर त्यांत झालें काय? औषधासाठीं तर प्यावी च लागणार. अर्थात् ती न पिण्याचें व्रत हें गळ्यांत लोढणें बांधून घेण्याप्रमाणें होय. आणि जी दारूची गोष्ट ती च इतर बाबींची. असत्य सुद्धां बऱ्यासाठीं बोलायला हरकत कोणती?"

मला या युक्तिवादांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. व्रत म्हणजे अढळ निश्चय. अडचणी ओलांडून जाण्यासाठीं तर व्रतांची जरूर असते. अडचणी सहन करीन पण डळमळणार नाहीं, तो च अढळ निश्चय म्हणावयाचा. अशा निश्चयाखेरीज मनुष्य उत्तरोत्तर उन्नति साधूं च शकत नाहीं, असा सर्व जगाचा अनुभव साक्ष देत आहे. जें पापरूप असेल

त्यासंबंधींच्या निश्चयाला व्रत म्हणतां च येणार नाहीं. तसला निश्चय राक्षसी वृत्तीचा द्योतक होय. आणि अमुक एक निश्चय, जो प्रथम आपल्याला पुण्यरूप वाटत होता तो च, अखेरीस पापरूप असल्याचें सिद्ध झाल्यास तो मोडणें हें आपलें अवश्य कर्तव्य होऊन बसतें. पण असल्या गोष्टींबद्दल कोणी व्रत घेत नसतो, घेणें रास्त हि नाहीं. जो सर्वमान्य धर्म समजला जात आहे, पण ज्याच्या आचरणाची आपल्याला संवय पडलेली नाहीं, त्याविषयीं च व्रत घ्यावयाचें असतें. वरील उदाहरणांत आपल्याला पापसें वाटतें तो केवळ भ्रम असेल. सत्य बोलल्यानें कोणाला हानि पोचली तर ?—असला विचार सत्यवादी करीत बसणार च नाहीं. सत्यापासून या जगांत कोणाची हानि झालेली नाहीं, कधीं काळीं व्हावयाची नाहीं, असा स्वतःच्या मनाशीं विश्वास धरावा. तसें च मद्यपानाबाबत. एक तर व्रत घेतांना च त्यामधें औषधापुरती सूट ठेवलेली असेल; तशी नसेल तर त्या व्रताच्या पाठीमागें

अनुक्रम २८७९ दि: ...

प्राणावरील संकट हि सहन करण्याचा निश्चय असणार. औषध म्हणून हि दारू घेण्याचें नाकारल्यामुळें देह पडला म्हणून तरी काय ? दारू घेऊन तरी देह जगेल च असें कोण लिहून देऊं शकेल ? आणि त्यावेळेपुरता समजा देह तगला आणि दुसऱ्या क्षणीं च कांहीं दुसरें निमित्त होऊन पडला तर त्याची जबाबदारी कोणाच्या माथीं ? आणि त्याच्या उलट, प्राणावर बेतले असतां हि दारू पिणार नाहीं च असल्या उदाहरणाचा दारूच्या दुर्व्यसनांत सांपडलेल्या लोकांवर जो विलक्षण परिणाम होईल तो जगाला किती लाभदायक होईल ? देह जावो अथवा राहो, धर्म हा आपल्याला पाळावयाचा च आहे, अशा तऱ्हेचा उदात्त निश्चय करणारांना च कधीं काळीं ईश्वराचा साक्षात्कार होऊं शकेल. व्रत घेणें हें दुर्बलतेचें चिह्न नव्हे तर खंबीरपणाचें द्योतक आहे. अमुक एक गोष्ट करणें उचित आहे, मग ती कांहीं झालें तरी करावयाची च, याचें नांव व्रत. आणि यांत

सामर्थ्य आहे. मग त्याला व्रत न म्हणतां दुसरें कसलें नांव द्यायचें असेल तर त्याला हरकत नाहीं. पण 'शक्य तोंवर करीन' म्हणणारा स्वतःच्या दुर्बलतेचें किंवा अभिमानाचें च प्रदर्शन करीत असतो. तो स्वतः त्याला नम्रतेचें नांव देत असो बापडा, परंतु त्यांत नम्रतेचा गंध सुद्धां नाहीं. 'शक्य तोंपर्यंत' हें वचन शुभ निश्चयांमध्यें विषवत् आहे असें मी तरी माझ्या स्वतःच्या जीवनामध्यें व इतरांच्या हि अनेकजणांच्या जीवनामध्यें पाहिलें आहे. 'शक्य तों पर्यंत' करणें म्हणजे पहिल्या अडचणीसरशी माघार घेणें. 'शक्य तोंवर सत्य पाळीन' या वाक्याला अर्थच नाहीं. व्यापारांत कोणी 'शक्य तर अमुक तारखेला अमुक रक्कम देईन' असली चिठ्ठी केव्हां हि चेक किंवा हुंडी म्हणून स्वीकारणार नाहीं. त्याचप्रमाणें शक्य तोंवर सत्य पाळणाराची हुंडी ईश्वराच्या पेढीवर पटविली जाणार नाहीं.

e2c6

ईश्वर स्वतः निश्चयाचा, व्रताचा, प्रत्यक्ष पुतळा आहे. तो आपल्या कायद्यापासून अणुमात्रहि ढळेल तर तो ईश्वर राहणार नाहीं. सूर्य महाव्रतधारी आहे म्हणून तर जगामध्यें काळ म्हणून वस्तु उत्पन्न झाली आहे व शुद्ध पंचांगें रचतां येत आहेत. त्यानें अशी पत मिळविली आहे कीं तो नित्य उगवत आला आहे व तसा च नित्य नेमानें उगवत जाईल. आणि म्हणून तर आपण आपले व्यवहार सुरळीतपणें चालवूं शकतों. व्यापाराची सर्व मदार एकवचनीपणावर आहे. व्यापारी आपापसांतील करारांनीं स्वतःला बांधून घेणार नाहींत तर व्यापार चालणार च नाहीं. अशा तऱ्हेनें व्रतांचा अंमल सर्वत्र असलेला दिसून येतो. तर मग जेथें आपलें जीवन च बांधून काढण्याचा प्रश्न येतो, ईश्वरदर्शन करण्याचा प्रश्न येतो, तेथें व्रताखेरीज चालावें कसें ? म्हणून व्रतांच्या आवश्यकतेसंबंधी आपल्या मनांत कधीं शंका च न उद्भवो.

# परिशिष्ट

[ मंगलप्रभातच्या अभ्यासकांना उपयोगी होईल अशा समजुतीनें आश्रमाच्या नियमावलीपैकीं पुढील भाग खालीं देत आहों. ]

## १ सत्य

सामान्य व्यवहारांत असत्य बोलूं नये किंवा आचरूं नये एवढा च सत्याचा अर्थ नव्हे. तर सत्य म्हणजे च परमेश्वर होय व त्याखेरीज दुसरें कांहीं हि नाहीं. या सत्याच्या शोधार्थ व पूजेच्या निमित्तानें इतर सर्व नियमांची आवश्यकता असते, आणि त्यांमधून च त्यांची उत्पत्ति आहे. या सत्याचा उपासक स्वतः कल्पिलेल्या देशहितासाठीं हि असत्य उच्चारणार नाहीं किंवा आचरणार नाहीं. सत्याखातर प्रह्लादाप्रमाणें मातापितरें किंवा इतर वडील मंडळी यांच्या आज्ञेचा विनयपूर्वक भंग करणें हि तो आपला धर्म समजेल.

## २ अहिंसा

प्राण्यांचा वध न करणें एवढें च या व्रताच्या पालनाला पुरेसें नाहीं. अहिंसा म्हणजे सूक्ष्म जंतूपासून तों थेट मनुष्यापर्यंतच्या सर्व जीवांबद्दल समभाव. या व्रताचा पालनकर्ता घोर अन्याय करणारावर सुद्धां क्रोध करणार नाहीं, तर त्याच्याविषयीं प्रेमभाव बाळगील, त्याचें हित चिंतील व करील. परंतु प्रेम करीत असला तरी अन्यायी इसमाच्या अन्यायाला वश होणार नाहीं, तर अन्यायाचा विरोध करील व तसें करीत असतां प्रतिपक्षी जे जे कष्ट देईल ते ते धैर्यपूर्वक व अन्यायी इसमाचा मनानें हि द्वेष न करतां सहन करील.

## ३ ब्रह्मचर्य

ब्रह्मचर्याच्या पालनाखेरीज वरील व्रताचें पालन अशक्य आहे. ब्रह्मचारी कोणा हि स्त्रीवर किंवा

पुरुषावर कुदृष्टि टाकणार नाहीं एवढ्यानें भागत नाहीं; तर त्यानें मनानें हि विषयाचें चिंतन किंवा सेवन करतां कामा नये. आणि विवाहित असेल तर स्वतःच्या स्त्रीबरोबर, किंवा पतीबरोबर, विषयभोग करणार नाहीं; परंतु तिला, किंवा त्याला, मित्र गणून तिच्याशीं, किंवा त्याच्याशीं, निर्मळ संबंध ठेवील. स्वतःच्या पत्नीचा किंवा इतर स्त्रीचा अथवा स्वतःच्या पतीचा किंवा इतर पुरुषाचा, विकारमय स्पर्श, किंवा त्यांच्याशीं विकारमय भाषण, किंवा इतर कसला हि विकारमय शारीरिक व्यापार म्हणजे हि स्थूल ब्रह्मचर्याचा भंग होय. पुरुषा-पुरुषांमधील किंवा स्त्रिया-स्त्रियांमधील, किंवा दोघांसंबंधींच्या कसल्या ही वस्तूला अनुलक्षून केलेली विकारमय हालचाल म्हणजेहि स्थूल ब्रह्मचर्याचा भंग च होय.

## ४ अस्वाद

मनुष्यानें जोंपर्यंत जिभेचे रस जिंकले नाहींत

तोंपर्यंत त्याला ब्रह्मचर्याचें पालन फार अवघड आहे असा अनुभव आल्यावरून च अस्वाद हें निराळें व्रत लेखण्यांत येत आहे. भोजन केवळ शरीर-धारणेसाठीं च असावें, मजेखातर कदापि नाहीं. यासाठीं तें औषध म्हणून संयमपूर्वक घेत जाणें आवश्यक आहे. या व्रताचें पालन करणारा विकार उत्पन्न करणाऱ्या मसाल्यांचा व त्यांसारख्या इतर पदार्थांचा त्याग करील. मांसाहार, मद्यपान, तंबाखू, भांग इत्यादि हि आश्रमाला निषिद्ध आहेत. या व्रतामध्यें स्वादासाठीं सण करण्याचा किंवा जेवण्या-खाण्याचा कोणास आग्रह करण्याचा निषेध आहे.

## ५ अस्तेय

दुसऱ्याची वस्तु त्याच्या परवानगीखेरीज न घेणें एवढें च या व्रताच्या पालनाला पुरेसें नाहीं. जी वस्तु ज्या उपयोगासाठीं आपल्याला मिळाली असेल त्याहू इतर कामाला ती लावणें, किंवा जेवढ्या

मुदतीपुरती मिळाली असेल तीहून अधिक मुदती-पर्यंत तिचा भोगवटा घेणें ही सुद्धां चोरी च. या व्रताच्या मुळाशीं असा एक सूक्ष्म सिद्धांत राहिलेला आहे, कीं परमात्मा प्राण्यांना त्या त्या वेळीं लाग-णाऱ्या आवश्यक तेवढ्या वस्तु त्या त्या वेळीं उत्पन्न करून देत असतो. त्याहून अधिक मुळीं च उत्पन्न करीत नाहीं. अर्थात् स्वतःच्या कर्मीत कमी आवश्यकतेपलीकडे मनुष्यानें एवढेंसें कांहीं जरी घेतलें तरी त्यानें ती चोरी च केली.

## ६ अपरिग्रह

अपरिग्रह अस्तेयामध्यें च येऊन जातें. अनवश्यक वस्तु घेणें ज्याप्रमाणें अयोग्य, त्याप्रमाणें च ती जवळ बाळगणें हि अयोग्य च. म्हणून ज्याची आवश्यकता नाहीं असें अन्न किंवा सामानसुमान संग्रहीं ठेवणें हा या व्रताचा भंग होय. ज्याचें खुर्चीशिवाय चालत असेल त्यानें खुर्ची ठेवूं नये. अपरिग्रही इसमानें आपलें जीवन नित्य साधें करीत जावें.

## ७ अंगमेहनत

अस्तेय व अपरिग्रह यांच्या पालनासाठीं अंग-मेहनतीचा नियम आवश्यक आहे. शिवाय कोणी हि मनुष्य असो, तो आपली शरीरयात्रा शारीरिक श्रमानें चालवील तर च तो समाजाचा व स्वतःचा द्रोह करण्याच्या दोषापासून मुक्त राहूं शकेल. ज्याचे हातपाय चालूं शकतात, व ज्याला हा सिद्धांत पटला आहे, अशा प्रत्येक स्त्रीपुरुषानें आपलें सर्व नित्याचें काम, जेवढें स्वतःला झेपण्यासारखें असेल तेवढें, स्वतःच उरकून घेतलें पाहिजे, आणि इतरांची सेवा विनाकारण घेतां कामा नये. पण बालकांची, इतर दुबळ्यापांगळ्यांची, आणि वृद्ध स्त्रीपुरुषांची सेवा करण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां तेव्हां ती करणें हा, ज्याला आपली सामाजिक जबाबदारी कळत आहे अशा प्रत्येक व्यक्तीचा धर्म आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

या आदर्शाचा अवलंब करणाऱ्या आश्रमामध्यें मजूर आहेत. जरूर तेथें च ठेवले जातात आणि त्यांच्याशीं धनी-चाकर असा संबंध ठेवण्यांत येत नाहीं.

## ८ स्वदेशी

मनुष्य सर्व शक्तिमान् प्राणी नाहीं. म्हणून च तो स्वतःच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची सेवा करण्यानें च जगाची सेवा करतो. या भावनेचें नांव स्वदेशी होय. स्वतःच्या नजीकच्या लोकांची सेवा टाकून दूरच्या लोकांची सेवा करण्यास किंवा घेण्यास जो धांवतो तो स्वदेशीचा भंग करतो. ही भावना पोषली गेल्यास जगांत सुव्यवस्था नांदूं शकेल. तिच्या भंगामुळें अव्यवस्था माजणार. या नियमान्वयें आपण होतां होईल तों आपल्या शेजारच्या दुकानाशीं व्यवहार ठेवावा; देशांत जी वस्तु होत असेल, किंवा सहजीं बनवितां येण्यासारखी असेल, ती वस्तु आपण परदेशाहून आणवूं नये. स्वदेशीमध्यें स्वार्थाला स्थान नाही. स्वतःची कुटुंबाच्या; कुटुंबाची

शहराच्या; शहराची देशाच्या; देशाची जगताच्या; कल्याणार्थ होळी करणें उचित आहे.

## ९ अभय

सत्य, अहिंसा इत्यादि व्रतांचें पालन निर्भयतेखेरीज अशक्य आहे. आणि सध्यां तर सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलेलें आहे. अशा स्थितींत निर्भयतेचें चिंतन व तिचा अभ्यास अत्यंत आवश्यक असल्या-मुळें त्याला व्रतामध्यें स्थान देण्यांत आलें आहे. ज्याला सत्यपरायण राहण्याची इच्छा आहे त्यानें जात-गोताचें भय धरतां कामा नये, सरकारचें भय धरूं नये, चोराचें धरूं नये, गरिबीचें धरूं नये, मृत्यूचें धरूं नये.

## १० अस्पृश्यतानिवारण

हिंदु धर्मामध्यें अस्पृश्यतेची रूढि दृढमूल झाली आहे. यांत धर्म नसून अधर्म च आहे, अशी आमची समजूत असल्यामुळें अस्पृश्यतानिवारणाला नियमां-मध्यें स्थान देण्यांत आलें आहे. अस्पृश्य मानल्या

जाणाऱ्या इसमांना इतर जातींच्या इसमांबरोबरीनें च आश्रमामध्यें वागविण्यांत येतें.

आश्रम जातिभेद मानीत नाहीं. जातिभेदामुळें हिंदुधर्माचें नुकसान झालें आहे अशी आमची समजूत आहे. त्यांत गर्भित असलेली उच्चनीचतेची व स्पर्शास्पर्शाची भावना अहिंसाधर्माला विघातक आहे. आश्रमाला वर्णाश्रमधर्म मान्य आहे. त्यांतील वर्णव्यवस्था केवळ धंद्यांना लागू आहे असें दिसतें. म्हणून वर्णव्यवस्थेचें पालन करणाऱ्या इसमानें वडिलोपार्जित धंद्यावर आपली उपजीविका चालवावी, आणि बाकीचा वेळ शुद्ध ज्ञान प्राप्त करण्यांत किंवा वाढविण्यांत खर्च करावा. स्मृतिग्रंथांनीं घालून दिलेली आश्रमव्यवस्था जगाला हितकारक होणारी आहे. परंतु वर्णाश्रमधर्म मान्य असला तरीहि आश्रमाचें जीवन हें गीतेला मान्य असलेला व्यापक व भावनाप्रधान असा संन्यासाचा आदर्श पुढें

ठेवून योजिलें असल्यामुळें आश्रमांत वर्णभेदाला जागा नाहीं.

## ११ सहिष्णुता

आश्रमाची अशी समजूत आहे कीं जगांत प्रचलित असलेले प्रख्यात धर्म सत्य व्यक्त करणारे आहेत. परंतु ते सर्व अपूर्ण अशा मनुष्यामार्फत व्यक्त झालेले असल्यामुळें सर्वांमधें अपूर्णतेचें अथवा असत्याचें मिश्रण झालेलें आहे. म्हणून आपल्याला स्वतःच्या धर्माबद्दल जेवढा आदर वाटतो तितका च आदर आपण इतरांच्या धर्मांबद्दल हि बाळगणें उचित आहे. जेथें अशा तऱ्हेची सहिष्णुता आहे तेथें एकानें दुसऱ्याच्या धर्माचा विरोध करण्याचा प्रश्न च उद्भवत नाहीं; परधर्मियांना आपल्या धर्मामध्यें ओढून आणण्याचा प्रयत्न हि शक्य नाहीं. पण त्या त्या धर्मांमध्यें असणारे दोष दूर व्हावे यासाठीं प्रार्थनेंत अशा च भावना नित्य मनांत दृढ करणें योग्य होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ..२१७६.... दि: ......

e254

# गांधीजींचीं पत्रें

[मूल्य १० आणे]

"हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या नांवानें आश्रम-जीवनाचे अनेक प्रयोग चालू आहेत. तेथील लोकांना या पत्रांचा उपयोग होईल च, पण ज्यांना ज्यांना म्हणून स्वतःचें जीवन सेवा-रत शुभ-संस्कारमय आणि आत्मपरायण व्हावें अशी इच्छा असेल त्या सर्वांना अगदीं बालबोध शैलीनें लिहिलेल्या या पत्रांचा अधिकाधिक उपयोग होईल. जीवनाकडे कसें पहावें, जीवन-मूल्यें कशीं ठरवावीं आणि जीवन-साधना साधीत असतांना कोणकोणच्या बाबतींत खास ध्यान ठेवावें, हें सगळें शिकविणारी जीवन-दृष्टि [illegible]ना या पत्रांतून मिळणार [illegible]त न शिरतां जीवन-सि[illegible]ं शिरावें, हें या पत्र[illegible]

[ प्रस्तावना : काकासाहेब कालेलकर ]

REFBK-0009284